INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY 4/9/03
Library

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक


३ ● तेलाचा व्यापार, गरिबी आणि श्रीमंती
७ ● गांधी आणि खादी
१२ ● आंतरराष्ट्रीय व्यापारातील स्त्री-पुरुष (अ)समानता
१५ ● अर्थशास्त्राच्या दारात मानसशास्त्र
१८ ● मदर टेरेसा
२० ● विनोद आणि शिक्षण
२३ ● 'थिंक स्मॉल' (स्थानसीमित व्यापार)
२६ ● पाणी व्यवस्थापन
२९ ● शांततेच्या पाऊलखुणा
३३ ● जगाच्या पाठीवर...
३५ ● कालप्रवाहात....


खंड २ : अंक ६ सप्टेंबर २००३

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

# 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी ?
# जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे "अर्थबोधपत्रिका" हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे. ◆अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनींच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठविणे अत्यावश्यक आहे. ◆अंक मिळविण्यासाठी वार्षिक वर्गणी १००रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $२०) डिमांड ड्राफ्ट / मनीऑर्डर / पोस्टल ऑर्डर / चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' या नावे** पाठवावी. त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.

**अर्थबोधपत्रिका : खंड २ (अंक ६) : सप्टेंबर २००३**

**संपादक** - रमेश पानसे, **संपादन साहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :** संपादक / व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : ५६५७१३२
: ५६५७२१०

ई-मेल : ispe@vsnl.com
फॅक्स : ५६५७६९७

# संपादकीय

सप्टेंबर २००३ च्या या अंकात, अमेरिकेतील दोन वर्षांपूर्वीच्या ११ सप्टेंबरच्या हल्ल्याची आठवण काढणे साहजिकच आहे. या आणि अशा जगभरच्या (अलीकडेच भारतातही बॉंबस्फोट घडवून आणण्याचे सत्र चालूच आहे !) हल्ल्यांकडे पाहण्याची एक अगदी वेगळी दृष्टी असू शकते, हे थिच हान्ह या बौद्ध विचारवंताने दाखवून दिले आहे. जगाला शांततेच्या दिशेने नेण्याचे स्वप्न आपण राखून ठेवले तर, थिच हान्ह यांनी दिलेली वैयक्तिक आणि सामाजिक जाणीव आपलीशी करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय दिसत नाही. दुसऱ्याबद्दल येणाऱ्या रागातून हिंसेचा जन्म होतो आणि आपण वैयक्तिक नि सामाजिक पातळीवर रागापासून आपला बचाव केला पाहिजे, ही विचारदिशा महत्त्वाची आहे. सद्भाव नि सामंजस्य ही सामाजिक वागणुकीची सूत्रे असायला हवीत, असे थिच हान्ह यांचे म्हणणे आहे.

हीच दिशा आपल्याला गांधीजींची आठवण करून देते. या अंकात खादीच्या प्रचारामागची गांधीजींची विचारधारा समजून देणारा एक लेख देण्यात आला आहे. गरिबी दूर करण्याशी असलेला खादीचा संबंध नेहमीच लक्षात घ्यायला हवा. स्थानसीमित व्यापाराचे महत्त्वही याच संदर्भात आहे.

गरिबी तेलाने दूर होत नाही तर उलट ती वाढते असा निष्कर्ष अलीकडच्या काही अभ्यासांतून निघालेला आहे. याविषयीचा एक सविस्तर लेख या अंकात देण्यात आला आहे.

मानसशास्त्राशी संबंधित दोन लेख या अंकात आहेत. अर्थशास्त्राला नवी दिशा मानसशास्त्र कशी देत आहे हे दर्शविणारा एक लेख आहे. तर, दुसरा विनोद आणि शिक्षण यांचा मानसशास्त्रीय संबंध दर्शविणारा आहे.

जगभरच्या पुरुषांची मानसिकता, विशेषतः स्त्रियांकडे पाहण्याच्या संदर्भातील दृष्टिकोण हा कायमच चिंतेचा विषय आहे. अगदी आंतरराष्ट्रीय व्यापारातही स्त्री-पुरुष असमानतेचा प्रश्न कसा गुंतला आहे हे या अंकातील एक महत्त्वाचा लेख वाचून, वाचकांच्या लक्षात येईल.

पुढील अंक हा ऑक्टोबर-नोव्हेंबर असा जोड अंक असेल आणि तो दिवाळीपूर्वी वाचकांच्या हाती पडेल अशी खात्री आहे. ■■

# वाचकांचा प्रतिसाद

अर्थबोधपत्रिकेचे अंक मी नियमितपणे वाचतो आहे. त्यातील माहितीपूर्ण लेखांचा वापर अनेक संदर्भांसाठी उपयुक्त ठरतो आहे. आपल्या यामागील कष्टाबद्दल धन्यवाद !

अनिल जोशी, वाई.

'जगाची उत्क्रांती की निर्मिती ?' या लेखात (जुलै २००३) स्टीफन जे गोल्ड यांच्या 'रॉक्स ऑफ एजेस' या पुस्तकातील काही संदर्भांचा वापर करून 'धर्म व विज्ञान' यांची सांधेजोड होऊ शकते, असे सूचित करण्यात आले आहे. या संदर्भात 'धर्म' या संकल्पनेचा नेमका अर्थ कोणता याचा शोध घेणे गरजेचे आहे. 'धर्म' याला इंग्रजीतील समानार्थी शब्द रिलिजन हा 'रिलिजिओ' या लॅटिन शब्दाचे रूप असून त्याचा शब्दशः अर्थ 'अलौकिक शक्तीचे संपादन व अधिकार' असा होतो. भीती, अज्ञान व अतार्किक विचार यातून धर्म ही संकल्पना रूढ झाली. नित्य जीवनातील नैसर्गिक घटनांच्या बाबतीतील प्रश्नांना जेव्हा उत्तर सापडत नव्हते, तेव्हा प्रश्नकर्त्यांचे तोंड बंद करण्यासाठी धर्म संकल्पनेचा आधार घेण्यात आला. त्यामुळे काही तज्ज्ञांच्या मते 'धर्म' हा शब्दप्रयोग चुकीचा असून त्याऐवजी अलौकिक (supernatural) हा शब्द वापरायला हवा. याच अलौकिकतेभोवती नीती, रूढी, परंपरा, ईश्वर, संस्कार इत्यादींचा साज चढवला गेला व धर्म संकल्पनेला प्रतिष्ठा मिळू लागली. विज्ञानाचा गाभा मात्र, निसर्गनियमांचा शोध हाच असल्यामुळे धर्म कायमचाच विज्ञानाच्या विरोधात असणार आहे. तसेच विज्ञान धर्मसंकल्पनेतील अद्भूत, अलौकिक, अतिभौतिक व अतार्किक अशा विचारांचा वा कृतींचा पर्दाफाश करीत राहणार आहे. त्यामुळे विज्ञान व धर्म यांना एका मोटेत बांधण्याचा प्रयत्न निष्फळ ठरणार आहे. एवढे मात्र खरे की, धर्माच्या मगरमिठीतून मानवाची सुटका केल्याशिवाय खऱ्या अर्थाने मानवाचा विकास शक्य नाही.

पी.के.नानवटी, पुणे.

अर्थबोधपत्रिकेच्या जुलै २००३ च्या अंकात, अनेक महत्त्वाच्या घटना, प्रश्नांचा अचूक वेध घेऊन वाचकांच्या भावनांना स्पर्श केलेला दिसून येतो. मानवाच्या

*(पान क्रमांक १७ वर पाहावे)*

आर्थिक

# तेलाचा व्यापार, भ्रष्टाचार आणि गरिबी व श्रीमंती !

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, जागतिक राजकारणात तेलाचे साठे हा एक महत्त्वाचा मुद्दा बनून राहिला होता. एकविसाव्या शतकातही आंतरराष्ट्रीय राजकारणासाठी तेलसाठे व तेलाचा व्यापार हाच कळीचा मुद्दा ठरतो आहे. या राजकीय प्रवाहात, एखाद्या देशात तेलाचा शोध लागणे म्हणजे जणू समृद्धीचा मार्गच सापडणे, असा विचार आंतरराष्ट्रीय स्तरावर बळावला तर नवल वाटायचे कारण नाही. पण त्याचवेळी, तेलाचे साठे व व्यापार यांमुळे किती देश समृद्ध झाले असतील ? तेल-उत्पादक देशांमधील गरिबी दूर झाली असेल का ? की त्यांना आणखी काही नव्याच प्रश्नांना सामोरे जावे लागले आहे ? असे प्रश्नही तज्ज्ञांना व अभ्यासकांना आकर्षित करीत होते. इराकमधील युद्धानंतर हे प्रश्न पुन्हा एकदा चर्चिले जात आहेत.

या संदर्भात हार्वर्ड विद्यापीठातील प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ जेफरी सॅक्स आणि त्यांचे सहकारी अँड्रयू वॉर्नर यांनी १९९५ मध्ये, तेल व देशांतर्गत अर्थव्यवस्था या विषयावर अभ्यास केला. विसाव्या शतकाच्या अखेरीस असा एक सार्वत्रिक समज होता की, तेलाच्या व्यापारामुळे तेल उत्पादक देशात श्रीमंती येत असेल; पण सॅक्स यांना अभ्यासात नेमके याच्या विरोधी चित्र आढळले. एखादा देश हा नैसर्गिक साधनसंपत्तीवर जितका अवलंबून असतो, तितका त्याचा वाढीचा दर हा कमी असतो, या निष्कर्षाप्रत हा अभ्यास पोचला तेव्हा, सॅक्स यांनी पुन्हा एकदा सर्व परिमाणे बदलून नव्याने अभ्यास केला, तरी निष्कर्ष बदलला नाही.

कॅलिफोर्निया विद्यापीठातील माइकिल रॉस यांनी केलेला अभ्यासही सॅक्स यांच्या निष्कर्षाला पाठिंबा देणारा ठरला. रॉक्स यांनी तेलाची विक्री आणि साक्षरता व तेलाची विक्री आणि कुपोषण यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास केला. त्यांना असे आढळले की, तेलाच्या निर्यातीत ५ टक्के वाढ झाली की आयुष्यमान तीन महिन्यांनी कमी होते आणि बालकांचे कुपोषण १ टक्क्याने वाढते.

अलीकडेच 'ख्रिश्चन एड' या संस्थेने केलेल्या एका अभ्यासाद्वारे असे स्पष्ट झाले आहे की, तेल उत्पादक देशांमध्ये गरिबी तर वाढतेच आहे, पण भ्रष्टाचारही वाढतो आहे. इराकमधील तेलाचा व्यापार पुन्हा चालू झाल्यांनतर इराकला सूचनावजा इशारा देण्यात आला आहे की, तेलाच्या व्यापाराने तेल उत्पादक देश कंगाल होत जातात. 'ऑर्गनायझेशन ऑफ पेट्रोलयिम एक्सपोर्टिंग कंट्रीज'चे (ओपीईसी-ओपेक)

संस्थापक आणि व्हेनेझुएलाचे (हा देश तेलाच्या निर्यातीत सहाव्या क्रमांकावर आहे) पेट्रोलियम खात्याचे तत्कालीन मंत्री जुआन पाब्लो पेरेझ् ॲल्फॉन्झो यांनी आपल्या देशात भाषण करताना देशवासियांना इशारा दिला होता की, 'तेलाच्या व्यापाराने व्हेनेझुएलाचे नुकसान होईल. तेलाचा व्यापार हा एक प्रकारचा सैतान आहे.'

## तेल उत्पादक (तरीही) गरीब देश !

'ख्रिश्चन एड'ने नायजेरियाला 'तेलाचा शाप असलेला देश' असे संबोधले आहे. आफ्रिकेतील सर्वात जास्त तेल या देशाच्या भूमीत आहे. तरीही या देशातील गरिबी वाढतेच आहे. दर दिवशीचे उत्पन्न फक्त एक अमेरिकन डॉलर (म्हणजे केवळ ४६ ते ४८ रुपये) किंवा त्यापेक्षाही कमी असणाऱ्या नागरिकांची संख्या १९८० मध्ये २७.८ टक्के एवढी होती, ती १९९५ मध्ये ६६ टक्क्यांपर्यंत वाढली.

अंगोला आणि सूदान येथे तेलावरील नियंत्रणावरून स्थानिक जमातींमध्ये मोठ्या प्रमाणावर दंगली झाल्या. या दंगलींवर धर्मांचाही प्रभाव होता. व्हेनेझुएलाने १९७० च्या दशकात, तेलाच्या व्यापारात ६०० अब्ज डॉलर्स मिळविले तरी, १९७३ ते १९८५ या काळात तेथील नागरिकांचे उत्पन्न सतत घटतेच राहिले.

तेलाच्या व्यापारात जगात प्रथम क्रमांकावर असलेल्या अरब देशांची परिस्थिती फारशी वेगळी नाही. सौदी अरेबिया, कुवेत, संयुक्त अरब अमिराती, बहारिन आणि इराण या देशांमधील अर्थव्यवस्था १९७० ते १९८९ या काळात, फारशी सुधारली नाही; उलट अर्थव्यवस्था आकुंचित झाली असे दिसते. मात्र याच काळात तेलाच्या व्यापाराला फार गती आलेली होती. जगातील तेलाचा सर्वात मोठा साठा सौदी अरेबियात आहे. येथील निर्यातीतील ८० टक्के वाटा हा तेल व वायूचा आहे. पण तरीही हा देश गरीबच राहिला आहे. असेही म्हटले जाते की, तेलाच्या व्यापाराचा फायदा येथील नागरिकांना झाला नाही म्हणून या देशातील नागरिकांमध्ये कडवा धर्माभिमान आता जाणीवपूर्वक वाढविण्यात येत आहे. (सौदी अरेबियातील राजघराण्याला मात्र या व्यापाराचा फायदा झालेला आहे.)

प्युरिटो रिको आणि स्लोव्हेनिया, सेंट किट्स आणि उरुग्वे या देशांची परिस्थिती थोडीशी बरी आहे एवढेच.

तेलाचा किंवा नैसर्गिक साधनांवर अवलंबून राहण्याचा हा प्रश्न फक्त विकसनशील देशांपुरताच मर्यादित आहे, असेही नाही. विकसित देशांमधील अर्थव्यवस्थांनाही याचा फटका बसला आहे. १९५० च्या दशकात, नैसर्गिक वायूचा शोध लागला होता. त्यानंतर डच अर्थव्यवस्थेला याचा फटका बसला होता. तेव्हा याला 'डच डिसिज' असे म्हटले गेले होते. नेदरलँडस् आणि नॉर्वे या देशांनी मात्र अशा संकटातून निभावण्याचा मार्ग शोधून काढल्याने ते यातून वाचले. थोडासा स्वतंत्र, स्वतःच्या देशाच्या हिताचा,

लोकशाही तत्त्वांना प्राधान्य देणारा विचार करून त्यांनी ट्रस्ट फंड (विश्वस्त निधी) स्थापन करून इतरही विविध उद्योगांकडे लक्ष दिले.

## तेल उद्योगातील भ्रष्टाचार

लोकशाही योग्य पद्धतीने राबविणे हा या विषयाशी संबंधित एक महत्त्वाचा मुद्दा आहे. आणखी एक बाब अशी की तेलाच्या व्यापाराशी संबंधित कंपन्या व देशादेशांमधील निर्णयप्रक्रियेतील मोठ्या व्यक्ती वा अधिकारीवर्ग यांच्यातील भ्रष्टाचार हाही एक काळजीचा विषय आहे. ब्रिटन व सौदी अरेबिया यांच्यातील 'अल-याम्माह शस्त्रास्त्र खरेदी-विक्रीचा करार' हा एक मोठा भ्रष्टाचार म्हणून गाजला होता. सौदी अरेबियाला गरज नसतानाही आणि देशाच्या अंदाजपत्रकात तूट असतानाही मध्यम दर्जाची शस्त्रास्त्रे घेऊन सौदी राजघराण्याने यात आपले कमिशन काढून घेतले, अशी चर्चा होती.

भ्रष्टाचारात हे राजघराणे एकटेच दोषी आहे असे नाही. एखादी मोठी बहुराष्ट्रीय कंपनीही मध्यपूर्वेतील तेलाच्या उत्पादनावर पूर्णपणे नियंत्रण ठेवण्यासाठी भ्रष्टाचार करू शकते. अमेरिकेतील तेल कंपन्यांमध्ये यासंबंधी चालू असलेली चौकशी ही या प्रकरणातील एक ताजी घटना आहे. १९९० च्या दशकात, कझाकस्तानातील तेल काढण्याचे कंत्राट मिळविण्यासाठी शेव्हरॉन टेक्साकोसह इतर अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विशेष रस घेतला होता. शेव्हरॉन टेक्साको या कंपनीच्या संचालक मंडळात पूर्वी कॉन्डोलिझा राईस यांचा समावेश होता. त्या सध्या अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या सुरक्षाविषयक सल्लागार आहेत. कझाकस्तानचे अध्यक्ष नूरसुल्तान नाझारबायेव्ह यांच्याशी जवळीक असणाऱ्या जेम्स गिफिन (स्वतंत्र बँकर) आणि ब्रायन विल्यम्स (मोबिल कंपनीचे माजी अधिकारी) यांच्याकडेही चौकशी खात्याची नजर वळली आहे. अर्थात, आपण काही गैरव्यवहार केले नाहीत, असे या दोघांनी म्हटले आहे.नाझारबायेव्ह यांच्या स्वीस बँकेतील खात्यात एक्सॉन-मोबिल (एक्सॉन व मोबिल या दोन कंपन्यांचे विलीनीकरण झाले आहे) या कंपनीच्या खात्यातून काही लाख डॉलर्स भरण्याची योजना आखण्यात आली असल्याच्या वृत्ताची शहानिशा सध्या करण्यात येत आहे. एक्सॉन-मोबिलने अर्थातच या प्रकरणी कानावर हात ठेवले आहेत. याच संदर्भात रशियातील प्रसिद्ध व्यापारी व राजकीय नेत्यांची नावेही चर्चेत आहेत. दरम्यान, या प्रकरणात, राईस यांच्याशिवाय बुश प्रशासनात असलेल्या आणखीही काही अधिकाऱ्यांची नावे पुढे येत आहेत.

अमेरिकेचा 'फॉरेन करप्ट प्रॅक्टिसेस ॲक्ट' (FCPA) हा एक कडक कायदा असून १९९७ मध्ये तो प्रथम लागू करण्यात आला तेव्हा अमेरिकेतील अनेक तेल उत्पादक कंपन्यांनी अशी तक्रार केली होती की यामुळे अमेरिकन कंपन्यांचे नुकसान होऊन परदेशांतील कंपन्यांचे चांगलेच फावेल. कारण, जगात जिथेजिथे तेलाचा व्यापार आहे तिथेतिथे गैरव्यवहार आहेत. हे म्हणणे अगदीच खोटेही नाही. फ्रान्समधील काही

कंपन्यांमध्येही गैरव्यवहार हा केंद्रस्थानी आहे, असे म्हटले जाते. पण अमेरिकेतील या कायद्यातून पळवाटा शोधणे शक्य आहे, असे या मोठ्या कंपन्यांमधील काही अधिकाऱ्यांचे मत आहे. तर सध्या चालू असलेल्या चौकशीनंतरच तेल कंपन्या काय करू शकतात व काय नाही हे आणखी स्पष्ट होईल, असे काही तज्ज्ञांचे मत आहे.

अंगोला या देशाला तेलाच्या व्यापारातून मिळालेल्या उत्पन्नापैकी दहा कोटी अमेरिकन डॉलर्स एवढी रक्कम कुठे केली ते अद्याप कळलेलेच नाही, असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने म्हटले आहे अंगोलातील तेलाचे कंत्राट फ्रान्समधील एका कंपनीकडे आहे. हे कंत्राट मिळविण्यासाठी या कंपनीला फार मोठे कमीशन द्यावे लागले होते. आणि अंगोलातील सर्वात 'वजनदार 'आणि श्रीमंत व्यक्ती म्हणजे (योगायोगाने ?) अंगोलाचे अध्यक्ष जोस एडुआर्डो डो सँन्टोस हे आहेत. तेलाच्या व्यवहारातून शस्त्रखरेदी वाढू नये म्हणून जागतिक बँकेने, चाड या देशाला मदत देताना काही अटी घातल्या होत्या. तरीही मदत मिळाल्यानंतर लगेचच तेथील नेतृत्वाने आपला शब्द बदलून शस्त्रखरेदी केली.

### इराक युद्ध आणि तेल कंपन्यांचे खाजगीकरण

अलीकडेच आणखी एक महत्त्वाची घटना घडली आहे. इराकमधील युद्धानंतर तेथे मदतकार्य फार मोठ्या प्रमाणावर चालू आहे. तेथील अर्थव्यवस्थेत हळूच शिरकाव करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे, पण तोही अप्रत्यक्षरीतीने. कारण, इराकचे पेट्रोलियम खात्याचे माजी अधिकारी फदहिल छालेबी यांनी अलीकडेच असे विधान केले आहे की, 'इराकमधील तेल कंपन्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याची गरज आहे, आणि यासाठी थोड्याफार प्रमाणात तरी खाजगीकरण करण्याची आवश्यकता आहे.' इराकचे युद्ध हे फक्त तेलासाठी झाले असे म्हणणेही कठीण आहे, कारण यद्धानंतरचा इराक हा पाणी, रस्ते, रेल्वे, फोन इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये खाजगीकरण झालेला (वेगळ्या शब्दात म्हणायचे तर सर्वात जास्त विकला गेलेला) देश असण्याची शक्यताच जास्त आहे.

या तेल कंपन्या सध्या आणखीही काही कारणांमुळे अडचणीत येत आहेत. त्या पर्यावरणाला हानी पोचवितात असे म्हणून विविध देशांत विविध संघटना त्यांना न्यायालयात खेचताहेत. इक्वेडोरमध्ये शेव्हरॉन टेक्साकोवर असाच खटला दाखल करण्यात आला आहे. याशिवाय स्थानिक संघर्षांमध्ये त्या अप्रत्यक्षरीतीने सहभागी होतात, मानवाधिकारांचे उल्लंघन करतात, असेही आरोप त्यांच्यावर करण्यात येत आहेत. दरम्यान तेलाचे साठे नसलेले पूर्व आशियातील अनेक देश आपल्या उद्योजकतेतून श्रीमंत होत आहेत, ही मात्र लक्षात घेण्यासारखी बाब आहे.

(संदर्भ - 'द कर्स ऑफ ब्लॅक गोल्ड' - निक कोहेन, न्यू स्टेट्समन, २ जून २००३, 'इकॉनॉमिस्ट'- १० मे २००३, इंटरनेट)

आर्थिक

# गांधी आणि खादी

गांधी म्हणजे खादी हे समीकरण जगभर प्रसिद्ध आहे. गंभीरपणे चरख्यावर सूत कातत असलेल्या गांधीजींचा फोटोही सर्वदूर ओळखीचा आहे. गांधींच्या खादीच्या आग्रहामध्ये कित्येकांना स्वातंत्र्यलढ्याचे प्रतीक वाटले, तर काही जणांना ते चक्क फॅडही वाटले. गांधींच्या प्रत्येक कृतीच्या मागे काही निश्चित स्वरूपाचा विचार होता, असे मानणारे लोकही जगामध्ये उदंड आहेत. ते गांधीजींच्या कृतीमागील राजनीती किंवा अर्थनीती नेमकेपणाने जाणतात. अशाच प्रकारे गांधींच्या खादीमागील अर्थनीतीचा आशय सांगणारा, भरत डोग्रा यांचा लेख 'ह्युमनस्केप' मासिकाने प्रसिद्ध केला आहे.

गांधीजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी गुजरातमधील साबरमतीला जेव्हा आपला 'सत्याग्रह आश्रम' स्थापन केला तेव्हाची ही गोष्ट. वस्त्र-स्वावलंबनाचा विचार गांधीजींच्या डोळ्यासमोर होता. त्यासाठी आश्रमात हातमाग घालणे किंवा विणकरांकडून कापड विणून घेणे असे पर्याय त्यांच्यासमोर होते. पण त्यासाठी लागणाऱ्या सुताचे काय ? ते पुन्हा कापड गिरण्यांकडूनच घ्यावे लागणार ! स्वदेशीचा आग्रह धरणाऱ्या गांधीजींना केवळ ब्रिटिश गिरण्यांच्या जागी देशी गिरण्या उभारणे हा खऱ्या स्वदेशीचा मार्ग वाटत नव्हता ; त्यांना गावोगावच्या खेडुतांचे कारखान्यावरील परावलंबित्वही डाचत होते. त्यावेळी त्यांनी लिहिले; "आपल्यासाठी लागणारे सूत आपणच कातावे यासाठी आम्ही अधीर झालो होतो. हे स्पष्टच होते की आम्ही स्वतःच जोवर हे करू शकत नाही तोवर गिरण्यांवरचे परावलंबित्व टिकूनच राहील. भारतीय गिरण्याचे प्रतिनिधी बनून आम्ही काही देशसेवा करू शकू, असे आम्हाला वाटत नव्हते."

परंतु खरी अडचण अशी होती की हाती सूत कातणारे चरखे काही कुठेच उपलब्ध नव्हते. मोठा इतिहास होता त्यामागे. ब्रिटिशांनी भारतीय खेड्यांची अर्थरचना उद्ध्वस्त करून टाकली होती. खेड्याखेड्यांमधील हस्तोद्योग, कुटिरोद्योग हे ब्रिटिश साम्राज्याच्या व्यापाररेट्यामुळे अक्षरशः धुळीस मिळालेले होते. बेकारी आणि तदनुषंगिक दारिद्र्य यांनी समाज पिचून गेला होता. अशा परिस्थितीत गांधीजींना चरखा हवा होता तो खेड्यांतील उद्योगांच्या पुनर्स्थापनेसाठी. गांधीजींनी म्हटले आहे, "या चरख्याच्या साहाय्याने मी अर्धबेकार, अर्धभुकेल्या भारतीय जनतेला काम पुरवू शकेन." ग्रामोद्योगांच्या

साहाय्याने दारिद्रय आणि बेकारीवर मात करायची होती आणि हाताने सूत कातून हातामागावरच विणलेली खादी हे, या ग्रामीण पुनर्रचनेचे प्रतीक होते.

सत्याग्रह आश्रमातील गांधीजींना उभ्या गुजरातमध्ये चरखा मात्र कुठेच मिळत नव्हता. अखेर, गंगाबेन मजुमदार या बाईंनी आव्हान स्वीकारले आणि गुजरातमधील खेड्यांची भटकंती सुरू केली. अखेरीस बडोदा संस्थानातील विजापूर हे असे एक खेडे, गंगाबेनना आढळले की जिथे प्रत्येक घरातच चरखा होता; पण तो होता माळ्यावर अडगळीत टाकून दिलेला. गंगाबेन गावकऱ्यांशी बोलल्या. "कुणी आम्हाला पेळूंचा सतत पुरवठा केला आणि आम्ही कातलेले सर्व सूत घ्यायची हमी दिली तर, आजही आम्ही आमच्या चरख्यांवरची धूळ झाडून काम करायला तयार आहोत." गावकऱ्यांनी तयारी दर्शविली.

एक प्रश्न मिटला. आता स्वहस्ते सूतकताई शक्य होती. पण पेळूंचे काय ? ते पुन्हा गिरण्यांकडूनच घ्यायचे ? गंगाबेन मजुमदारांची भटकंती थांबलेली नव्हतीच. त्यांनी पिंजारीही शोधून काढला; आणि त्याच्या तालमीत, कापूस पिंजून पेळू बनविण्याचे काम शिकवून काही युवकांना तयार केले. अखेरीस सत्याग्रह आश्रमात पिंजण्याचे, कताईचे नि विणण्याचे काम सुरू होऊन, खादी कापड तयार होऊ लागले.

गांधीजींची ही सारी स्वदेशीची खटपट कानावर पडली तेव्हा एक गिरणीमालक गांधीजींना भेटायला गेले. त्यांनी पटवून द्यायचा प्रयत्न केला की, "विदेशी गिरण्यांवरील परावलंबित्व कमी करण्याचा मार्ग आहे, स्वदेशी गिरण्या मोठ्या संख्येने उभारणे." गांधीजी उत्तरले, "तेच नेमके टाळायचा मी प्रयत्न करतोय. उलट मी या चरख्याचेच पुनरुज्जीवन करतोय. कारण, स्वदेशीच्या याच मार्गाने मी भारतातील अर्धबेकार, अर्धभुकेल्या महिलांना काम देऊ शकणार आहे. या महिलांनी सूत कातावे नि त्या सुताची खादी विणून भारतीय जनतेची वस्त्राची गरज या खादीने भागवावी." अशी ही योजना होती.

या कृतीमागचे अर्थशास्त्र महत्त्वाचे होते. गावकऱ्यांच्या वस्त्रासारख्या मूलभूत गरजा भागविणे याचा संबंध गांधीजी गावातील बेकारांना काम पुरवून त्यांच्या उपजीविकेशी जोडत होते. भरत डोग्रा आपल्या लेखात दाखवून देतात की, आजच्या जागतिकीकरणाच्या पर्वात आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या व्यापक बेकारीच्या काळात, समाजाच्या मूलभूत गरजांची पूर्ती आणि उपजीविकेची साधने पुरवून गरीबांसाठी व्यापक रोजगार निर्मिती करणे व त्यासाठी ग्रामोद्योग विकसित करणे, हा गांधीजींचा विचार आजही सयुक्तिक

आहे. भारतात दरडोई जमिनीचे प्रमाण विचारात घेता, गांधीजींनी असे मत १९१९ सालीच व्यक्त केले की, "कुटिरोद्योगांशिवाय भारतीय शेतकरी बुडण्याचीच शक्यता आहे; कारण केवळ शेतीउत्पन्नातून त्याचा चरितार्थ चालणे कठीण आहे." अर्थात, या अर्थकारणाची आणखीही एक बाजू आहे; खेड्यांतील उद्योग टिकायला हवे असतील तर त्यांच्यासाठी मागणीही स्थानिक समाजातून यायला हवी. १९३४ साली, खादीचा बऱ्यापैकी प्रसार झाल्यानंतर गांधीजींनी लिहिले आहे की, "खादी हे खेड्यातील लोकांचे कायम स्वरूपी वापरण्याचे वस्त्र झाले तरच खादी उद्योगही कायम टिकून राहील, हे सर्वांनीच लक्षात घेतले पाहिजे." उपभोक्त्यांनी याप्रकारे आपली स्वदेशीची जबाबदारी ओळखली तरच सार्वत्रिक बेकारीवरचा तोडगा सापडू शकेल.

खादीविषयीच्या अर्थशास्त्रातून गांधीजींचा यंत्रांकडे पाहण्याचा दृष्टिकोणही स्पष्ट होतो. मोठ्या प्रमाणावरील उत्पादन करणाऱ्या यंत्रांना गांधीजींचा विरोध होता, हे मत सर्वत्र प्रसृत झालेले आहे. त्याविषयी गांधीजींनी स्पष्टपणे म्हटले आहे की, "माझा विरोध आहे तो यंत्राला नाही तर यंत्रवापराच्या वेडाला आहे. हे वेड आहे ते, ज्याला ते 'श्रमशक्तीची बचत' करणारी यंत्रे म्हणतात, त्याचे आहे. माणसे श्रमशक्तीची बचत करू पाहतात आणि मग हजारोंच्या संख्येने माणसे बेकार होऊन रस्त्यांवर फेकली जातात आणि भुकेने ती मृत्युमुखी पडतात. ज्या यंत्रांमुळे काही थोडे लोक श्रीमंत होतात आणि परिणामतः हजारो लोक कामांवरून उखडली जातात, अशा यंत्रांना मी स्वीकारू शकत नाही." मग कोणती यंत्रे गांधीजी स्वीकारतात ? गांधीजींनी १९३५ साली त्याचे उत्तर दिले आहे. "जी यंत्रे स्त्री-पुरुषांना त्यांच्या श्रमसंधीपासून दूर लोटत नाहीत, तर उलट, व्यक्तीला तिची कार्यक्षमता वृद्धिंगत करायला मदत करतात आणि जी यंत्रसामग्री व्यक्ती, स्वतः तिचा गुलाम न बनता, सहजपणे हाताळू शकते, " अशा यंत्रांचा स्वीकार गांधीजी करतात. या विचारांच्या संदर्भात गांधीजींना खादीचे महत्त्व अनिवार्य वाटत होते. भारतीय परिस्थितीत चरखा हे त्यांना समुचित तंत्रज्ञानाचे प्रतीक वाटत होते. कारण, गांधीजी १९२७ साली लिहितात, "इथे यंत्रांचा वापर होतोय तो खेड्यातील गरिबांच्या घरांतून थेट सेवा पुरविण्यासाठी."

अशाप्रकारे खादी ही शहरे नि खेडी यांतील संबंध अधिक दृढ करण्यासाठी, शहरांतील उद्योगांची खेड्यांमधून प्रस्थापना करणारी अशी बाब होऊन खेडी अधिक अर्थसंपन्न होतील अशी धारणा आहे. हातांनी काम करून आपली उपजीविका करण्याच्या गांधीजींच्या कल्पनेला आणखी एक परिमाण आहे; ते आहे कलात्मक

आनंदाचे किंवा श्रमानंदाचे. उद्योगाचे, उत्पादनाचे कामही आनंददायक असू शकते याची जाणीव गांधीजी, खादीच्या कामाच्या संदर्भाने देतात. ते म्हणतात, "(सूतकताईचा) आजपर्यंतचा अनुभव असे सांगतो की, सुतकताई ही एक उत्तम कला आहे आणि ती सबंध प्रक्रियाच अतिशय आनंददायक आहे. केवळ यांत्रिक गोष्टी या तलम धागा काढायला पुरेशा नसतात. जे प्रत्यक्ष कताई एक कला म्हणून अंगिकारतात, त्यांना हे माहीत आहे की हात आणि डोळे त्या यंत्राकडून हव्या त्या जाडीचा धागा कसा निर्माण करून घेतात, आणि यातून केवढा मोठा आनंद आपल्याला मिळतो." याच संदर्भात १९२९ साली, म्हणजे सूतकताईचा भरपूर अनुभव घेतल्यानंतर त्यांनी असे म्हटले आहे की, "अमानवी आणि ऊर्जेचा वापर करून मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारी यंत्रे खऱ्या कलेची जन्मदात्री होऊशकत नाहीत, त्यासाठी स्त्री-पुरूषांच्या हातांचा नाजूक स्पर्शच आवश्यक असतो." "तो पवित्र स्पर्शच खादीला जिवंतपणा आणून इतिहास घडवतो; हे यांत्रिक पद्धतीने केलेल्या सूतकताईला शक्य नसते. यांत्रिक वस्तूंत जर काही कला असेलच तर ती फक्त डोळ्यांना सुखविते, पण खादीची कला ही आधी थेट हृदयाला जाऊन भिडते नि मग डोळ्यांनाही समाधान देते." (१९३४)

खादी निर्मितीच्या व्यवसायाबाबत आणखी एका वेगळ्या दिशेने गांधीजी आपल्याला विचारप्रवृत्त करतात. आधुनिक उत्पादनाचे जग हे स्पर्धात्मक जग आहे तर गांधीजींचा सारा भर सहकारावर आहे. खादी व्यवसायात असणारे पिंजारी, पेळू काढणारे, कताई करणारे, विणकर आणि ग्राहक हे सर्व घटक परस्परावलंबी अशा सहकाराच्या धाग्यात कसे बांधले जातात याचे वर्णन गांधीजींनी एके ठिकाणी केले आहे. या सर्वांची एक सहकारीसंस्थाच कशी निर्माण होते हे त्यांनी दाखविले आहे. ते म्हणतात, "जर सूतकताई एखाद्याला स्वावलंबी बनवत असेल तर त्याला याचीही जाणीव प्राप्त होते की, प्रत्येक पायरीला तो दुसऱ्यांवर अवलंबूनही असतो."

गांधीजींची खादीची संकल्पना फॅड म्हणून किंवा चेष्टेचा विषय म्हणून टाकून देण्यासारखी नाही. कारण, अर्धनग्न लोकांना वस्त्र, अर्धपोटी लोकांना अन्न आणि अर्धबेकार लोकांना काम पुरविण्यात ही योजना निखालसपणे यशस्वी झाली. १९१६ साली साबरमती आश्रमात खादी चळवळीची सुरूवात झाली, ती गांधीजींच्या जीवनात अखंडपणे चालूच राहिली. १९३६ साली, म्हणजे खादीकार्याला वीस वर्षे पूर्ण झाल्यानंतर गांधीजींनी या कार्याचे मूल्यमापन करून म्हटले की, "लाखो लोकांच्या बाबतीत खादीने केलेली प्रगती व्यक्तिगत पातळीवर एक लहानशी गोष्ट असली तरी तुलनेने

तो आज सगळ्यात मोठा उद्योगधंदा आहे. हा धंदा तुलनेने पाहता, सर्वात जास्त खेडुतांना, सर्वात जास्त रकमेच्या मजुरीचे वाटप करतो; आणि तेही तुलनेने अतिशय कमी गुंतवणुकीत. शिवाय, यातील प्रत्येक पैसा हा खेड्यांतील लोकांच्यातच फिरत असतो.''

खेड्यांची वर्षानुवर्षांची परिस्थिती लक्षात घेता, तेथील कुटिरोद्योग, हस्तोद्योगांच्या ऱ्हासामुळे ओढवलेली ओढग्रस्त परिस्थिती गांधीजींनी हेरली होती. त्यावर, त्यांनी या उद्योगांच्या पुनरुज्जीवनाची तोड काढली होती. खादी ही त्याची सुरूवात होती; इतरही अनेक ग्रामीण उद्योगांच्या पुनरुभारणीचा संदेश त्यांनी दिला; त्यांच्या प्रेरणेने अनेक कार्यकर्ते खेड्यांच्या विकासासाठी मोठ्या हिरिरीने या कार्यात उतरले. खेड्यांना नव्याने जीवनदान देण्याच्या या व्यापक प्रयत्नांचे एक प्रतीक म्हणूनही आपण खादीकडे पाहू शकतो.

*(संदर्भ - ह्युमनस्केप, मे-२००३)*

■■

*'सर्व माणसे समान आहेत'*

*मानवी व्यक्ती, जगातील सर्वच वस्तूंप्रमाणे, अनेक बाबतीत असमान असतात हे नाकारणे अर्थातच शक्य नाही; तसेच ही असमानता अतिशय महत्त्वाची आहे, आणि काही बाबतीत अत्यंत इष्टही आहे हेही निःसंशय.... पण या सर्व गोष्टी माणसांना विशेषतः राजकीय बाबतीत समान म्हणून, निदान शक्य तितके समान म्हणून वागविण्याचे आपण ठरवावे का, म्हणजे समान हक्क आणि समान वागणूक मिळण्यास पात्र समजावे का, या प्रश्नांशी पूर्णपणे अप्रस्तुत असून, आपण त्या प्रकारच्या राजकीय संस्था निर्माण कराव्या काय या प्रश्नाशी पूर्णतः असंबद्ध आहेत. 'कायद्याच्या दृष्टीने समानता' ही वस्तुस्थिती नाही, ती नैतिक विचारावर आधारलेली एक राजकीय मागणी आहे, आणि तिचा 'सर्व माणसे समान आहेत' या (बहुधा असत्य असलेल्या) मताशी काही संबंध नाही.*

कार्ल पॉपर

स्त्री - ऊर्जा

# आंतरराष्ट्रीय व्यापारातील स्त्री-पुरुष (अ)समानता !

आंतरराष्ट्रीय व्यापारात, कॉफीपासून कम्प्युटरपर्यंत आणि पापडापासून कापडापर्यंत अशा अनेकविध उत्पादनांच्या निर्मितीत स्त्रियांचा फार मोठा सहभाग आहे. 'वर्ल्ड डेव्हलपमेंट रिपोर्ट ' नुसार संपूर्ण जगात देशोदेशींच्या निर्यात प्रक्रिया क्षेत्रांत (एक्सपोर्ट प्रोसेसिंग झोन्स) ७० ते ९० टक्के स्त्री-कामगार आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर शेतीसंबंधित व्यापाराची उलाढाल अब्जावधी रुपयांमध्ये आहे आणि विकसनशील देशांमधील शेती व खाद्यान्नासंबंधीच्या व्यापारात, स्त्रिया मोठ्या प्रमाणात काम करीत असतात. जगातील किमान निम्मे तरी अन्न हे स्त्रियांच्या विविध कामांमधून तयार होत असते. थोडक्यात निम्म्या जगाचे पोट हे स्त्री-कामगारांच्या श्रमांमुळे भरते. असे असतानाही आंतरराष्ट्रीय व्यापार हे पुरुषांचे क्षेत्र आहे, स्त्रियांचे नव्हे, अशी पुरूषांची (आणि काही प्रमाणात स्त्रियांचीसुद्धा) तयार झालेली भूमिका बदलण्याची वेळ आलेली आहे.

म्हणजे असे की, आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी स्त्रियांचे काम उपयुक्त ठरत असले तरी हा व्यापार स्त्रियांसाठी उपयुक्त ठरतो आहे का ? या स्त्रियांना कामाच्या ठिकाणी चांगली वागणूक, व चांगल्या सोयी-सुविधा मिळतात का ? यात सहभागी झालेल्या स्त्रियांना त्याचे आर्थिक, सामाजिक फायदे मिळाले आहेत का ? आणि या प्रश्नांची उत्तरे अद्याप नकारार्थी मिळत असतील तर आता, स्त्रियांनी व धोरणकर्त्यांनी नेमके काय करायला हवे ? याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरू लागले. यासंदर्भातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील काही घडामोडींचा हा आढावा:

अलीकडेच, अमेरिकेतील स्त्रियांनी या प्रश्नांमध्ये रस घेतला असून अमेरिकेने यासंबंधी काही धोरणात्मक निर्णय घेऊन स्त्रियांना न्याय द्यावा, अशी मागणी नेटाने लावून धरली आहे. १९८० व १९९० च्या दशकांत जागतिक व्यापार जसजसा वाढू लागला तसतसा स्त्रियांच्या सहभागाचा मुद्दा प्रकर्षाने पुढे येऊ लागला. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे १९९५ मध्ये बीजिंग येथे झालेल्या जागतिक स्त्री परिषदेत अशा काही महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा झाली होती. यानंतर अमेरिकेतील क्लिंटन प्रशासनाने यासाठी एक 'टास्क फोर्स' नेमला होता. विसाव्या शतकाच्या अखेरीला, आंतरराष्ट्रीय व्यापारातील

तज्ज्ञ मंडळी स्त्रियांच्या हक्कांबाबत स्त्री संघटनांचे म्हणणे ऐकून घेत आहेत, असे चित्र उभे राहिले होते. उदाहरणार्थ, १९९७, १९९८ आणि १९९९ मध्ये 'एशिया पॅसिफिक इकॉनॉमिक कोऑपरेशन' या संघटनेने स्त्रियांच्या प्रश्नांसाठी मंत्रीस्तरावरील चर्चा-बैठका घडवून आणल्या. (या संघटनेत २१ देशांचा सहभाग आहे.) अर्थात, यातून स्त्री-संघटनांच्या हाती फारसे काही पडले नाही. स्त्री-कामगारविषयक कायदे किंवा इतर मागण्या याबाबत ठराव होऊन ते प्रश्न कायमचे मिटले, असे काही घडले नाही.

## आंतरराष्ट्रीय व्यापाराला स्त्री संघटनांचा विरोध

यानंतर स्त्री संघटना आणि कामगार संघटना एकत्र येऊन जागतिक व्यापार हा गरिबांना फायदेशीर ठरू शकणार नाही, असे म्हणून जागतिक व्यापारावर टीका करू लागल्या. पर्यावरणवादी गटांनीही या सुरात सूर मिसळला. दरम्यान, स्त्रीविषयक काम करणाऱ्या आशियातील अनेक स्वेच्छाकार्य संस्थांनी एकत्र येऊन (मलेशिया-१९९९) जागतिकीकरणाला महिलांचा विरोध आहे, असेही जाहीर केले. १९९९ च्या अखेरीस तर महिला संघटनांनी 'इंटरनॅशनल जेंडर अँड ट्रेड नेटवर्क' स्थापन करून आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महिलांवर कसे वाईट परिणाम होतात, याबाबत नागरिकांना माहिती देणे सुरू केले.

उत्पादन प्रक्रियेत स्त्रियांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असतानाही त्यांच्यासाठी कामाच्या ठिकाणी पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध नसतात. त्यांच्याकडून ढोर मेहनत करवून घेतली जाते आणि त्यांना अपुरे वेतन दिले जाते, अशी कारणे स्त्री-संघटनांसाठी महत्त्वाची होती. स्त्री-कामगारवर्गात बहुतांश स्त्रिया या एकट्या, परिस्थितीने ग्रासलेल्या आणि तरूण असतात; तर कारखान्यातील व्यवस्थापन हे मध्यमवयीन पुरुषांच्या हातात असते. बहुतांश कारखान्यांमध्ये एकाच प्रकारचे काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांना मिळणारे वेतन हे समान नसते. पुरुष कामगारांच्या तुलनेत स्त्रियांना ५० ते ८० टक्के वेतन दिले जाते. पुरुष कामगारांना नोकरीतील जे फायदे दिले जातात, ते स्त्री कामगारांना दिले जात नाहीत, त्यांना कंत्राट पद्धतीने नोकरी देण्यात येते, त्यामुळे त्यांना इतर फायदे देण्याचे बंधन व्यवस्थापनावर नसते.

स्त्रियांना कामाशी संबंधित विविध अनुभवांपासून आणि प्रशिक्षणापासून वंचित ठेवण्यात येते. तसेच आर्थिक अडचणीच्या वेळी स्त्रियांनाच प्रथम कामावरून काढण्यात येते, असे या संघटनांचे म्हणणे होते. याशिवाय या संघटनांना असेही आढळले की, स्त्रियांना नोकरी टिकविण्यासाठी अनेकदा शारीरिक अत्याचारांना देखील सामोरे जावे

लागते. या प्रकाराला स्त्रियांनी नकार दिल्यास त्यांचे वेतन रोखण्याच्या घटनाही घडल्या आहेत. असे अन्याय विकसनशील देशांमध्ये जास्त प्रमाणात घडले आहेत. पण आंतरराष्ट्रीय व्यापारात विकसनशील देशांमधील स्वस्त असलेल्या श्रमांचा उपयोग, विकसित देशांना होत असल्याने तेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या यात दोषी ठरत असतात, असे स्त्री संघटनांचे म्हणणे आहे.

## आंतरराष्ट्रीय पातळीवरील करार (CEDAW)

खरे तर, स्त्रियांवर कामाच्या ठिकाणी अन्याय होऊ नये यासाठी 'कन्व्हेंशन ऑन द एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑफ डिस्क्रिमिनेशन अगेन्स्ट विमेन' (CEDAW) असा एक करार आंतरराष्ट्रीय पातळीवर १९७९ मध्येच करण्यात आला आहे. १९८१ पासून हा करार लागू करण्यात येऊ लागला. या करारासंबंधीचे २९ वे चर्चासत्र अगदी अलीकडेच, (३० जून ते १८ जुलै २००३ या काळात) राष्ट्रसंघाचे मुख्य कार्यालय असलेल्या न्यूयॉर्क शहरात पार पडले. यावेळी असे जाहीर करण्यात आले की, "कराराला एकूण १७४ देशांनी आणि संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व स्वीकारलेल्या किमान ९० टक्के राष्ट्रांनी मान्यता दिली आहे." यात भारत, दक्षिण आफ्रिकेतील अनेक देश, जपान तसेच अफगाणिस्तान आणि सौदी अरेबिया अशा अनेक देशांचा समावेश आहे ! (अर्थात करार मान्य करणे ही झाली एक बाब. पण प्रत्यक्षात देशादेशांमधील परिस्थितीत काही सुधारणा झाली आहे किंवा नाही हा परत वादग्रस्त मुद्दा ठरू शकतो !)

मात्र लोकशाहीचे आणि समानतेचे गोडवे गाणाऱ्या अमेरिकेने या एकविसाव्या शतकातही, याला अद्याप मंजुरी दिलेली नाही. म्हणून अमेरिकेतील स्त्रियांनी आता हा प्रश्न पुढे रेटला आहे. अमेरिकेच्या सिनेटने मंजूरी दिल्याखेरीज अमेरिका या कराराला बांधील राहू शकत नाही. हा करार मान्य करण्याबाबत अमेरिकेत मतमतांतरे आहेत. स्त्री-पुरुष समानतेला उचलून धरण्यात अमेरिका आघाडीवर असून या कराराची अमेरिकेला गरज नाही, असे काहीं तज्ज्ञांना वाटते. तर या कराराला मंजूरी देऊन अमेरिकेने स्त्रियांवरील सर्व प्रकारचे अत्याचार रोखण्यात सहभागी व्हायला हवे, असे मत काही घटकांनी व्यक्त केले आहे. अमेरिकेचे, आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यापारी करार स्त्री कामगारांचे प्रश्न उचलून धरण्यात अयशस्वी ठरले आहेत, असे अमेरिकेतील स्त्री संघटनांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता सिनेटमध्ये या विषयावर वादग्रस्त चर्चा होण्याची लक्षणे आहेत. *(संदर्भ - इंटरनेट)* ■■

आर्थिक

# अर्थशास्त्राच्या दारात मानसशास्त्र

अर्थशास्त्राच्या क्षेत्रात नवीन काही घडू पाहत आहे. त्यातून जुने काही मोडून पडेल की काय अशी शक्यता वर्तविली जात आहे. अजूनही नवसनातनवादी सैद्धांतिक अर्थशास्त्राचा पगडा अर्थव्यवहारांवर आहे. तो जसा धोरणकर्त्या अर्थशास्त्रज्ञांवर असतो, तसाच तो विद्यापीठीय स्तरावरील अध्यापकांवरही असतो.

माणसात एक 'स्वार्थ ' वास करीत असतो; आणि मनुष्य (आपल्या स्वार्थासाठी) 'बुद्धिनिष्ठते'ने वागत असतो अशी दोन परस्परसंबंधित गृहिते नवसनातनवादी अर्थशास्त्राने स्वीकारलेली असून त्यांच्या पायावर अर्थशास्त्राची सैद्धांतिक इमारत उभी केली आहे, तसेच मनुष्य वागणुकीची गणिती सूत्रेही सिद्ध केली आहेत. अर्थात् कोणताही मनुष्य प्रत्यक्ष व्यवहारात या गणिती नेमकेपणाने वागत नसतो, असेही स्पष्टीकरण करून नवसनातनवादी अर्थशास्त्राने आपल्या विवेचनात लवचिकतेला वावही ठेवला आहे. मनुष्य बुद्धिनिष्ठतेने वागतो, या गृहिताचा व्यावहारिक आशय असा आहे की, त्याच्या आवडी आणि प्रामुख्याने निवडी या सुसंगत असतात आणि त्यांच्या आधारांवर काही सैद्धांतिक नि धोरणविषयक आडाखे बांधता येतात. नवसनातनवादी अर्थशास्त्राने उदार आर्थिक धोरणांचा प्रतिपाळ केला आहे. अर्थव्यवस्था मुक्त असावी, त्यात सरकारचा हस्तक्षेप मर्यादित असावा, जादा कर असू नयेत, वातावरण स्पर्धात्मक असणे चांगले इत्यादी. अलीकडे मात्र नवसनातनवादी विचारांत आणखी मोकळेपणा येऊन इतर सामाजिक शास्त्रांच्या क्षेत्रांतही, त्यांची तंत्रे वा उपायांचा शिरकाव होऊ लागला आहे.

अर्थात, नवसनातनवादी अर्थशास्त्राविषयीचे, विशेषत: व्यष्टी स्तरावरील सैद्धांतिक पायावर उभारलेल्या निष्कर्षात्मक इमारतीचे टीकाकारही अनेक आणि सुरूवातीपासूनचे आहेत. अनेकांना, अवास्तव गृहितांवर आधारित अशा घट्ट सैद्धान्तिक बांधणीविषयी असमाधान आहे. अर्थशास्त्रीय विकासातही अनेक अंगांनी, जे विचार पुढे प्रसृत होत गेले ते नवसनातनवादी अर्थशास्त्रापासून दूर गेले आहेत.

व्यष्टी स्तरावरील नवसनातनी अर्थशास्त्रापासून दूर गेलेल्या अर्थशास्त्रज्ञांनी आता नव्या दिशेने आपल्या प्रयत्नांचे मोर्चे वळविले आहेत. अमेरिकेतील हार्वर्ड

विद्यापीठ हे अर्थशास्त्राचे एक मान्यवर नि प्रभावशाली असे पीठ आहे. तेथील प्राध्यापक मार्टिन फेल्डस्टिन (हे गृहस्थ पूर्वी अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांचे आर्थिक सल्लागार होते !) यांनी नवसनातनवादी दृष्टिकोणांतूनच पण एक अगदी नवा पर्यायी अभ्यासक्रम पदवीपूर्व पातळीवर आणला आहे. हा अभ्यासक्रम सुचविला आहे तो स्टीफन मार्गालिन यांनी. ते तेथे संशोधन प्राध्यापक आहेत. (केन्सचा मागणीसिद्धांत आणि मार्क्सवादी दृष्टिकोण यांची सांगड घालण्याचा प्रयत्न, त्यांच्या नावावर आहे !) हा नवीन अभ्यासक्रम तयार करताना, 'वर्तनवादी अर्थशास्त्रा'चा फार मोठा आधार घेतलेला आहे.

या अभ्यासक्रमाचा मुख्य भर आहे तो मानसशास्त्रातील काही अभ्यासघटकांवर. नवसनातनवादी अर्थशास्त्रातील 'आर्थिक मनुष्य ' हा 'बुद्धिनिष्ठ ' आहे; पण ही 'बुद्धिनिष्ठ ' वागणूक आता मानसशास्त्राच्या आधारे अधिक नेटकेपणाने शोधण्याचा प्रयत्न आहे; आणि त्यासाठी वर्तनवादी मानसशास्त्र उपयोगात आणले जात आहे. या प्रयत्नांत, प्रामुख्याने, डॅनियल कान्हेमन या मानसशास्त्रज्ञाच्या कल्पना, आधारभूत म्हणून घेतल्या आहेत. (कान्हेमन यांना गेल्याच वर्षी, अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार देण्यात आला आहे !) डॅनियल कान्हेमन यांनी त्यांचे सहकारी ॲमस वेर्स्की (यांचे १९९६ मध्ये निधन झाले.) यांच्या समवेत केलेल्या अनेक प्रयोगांमधून, बुद्धिनिष्ठ आर्थिक मनुष्य, किती विविध पद्धतींनी धोक्यांचा अंदाज घेत असतो, हे दृष्टोत्पत्तीस आणून दिले आहे.

वरवर पाहता तरी असे दिसून येते की, या वर्तनवादी मानसशास्त्राच्या आणि त्याकरवी वर्तनवादी अर्थशास्त्राच्या क्षेत्रात काही उलथा-पालथा घडू पाहत आहे; पारंपरिक सनातनवादी अर्थशास्त्राला धक्के दिले जात आहेत. उदाहरणार्थ, पूर्वीचे बुद्धिनिष्ठतेचे गृहीत आता स्वीकारणे कठीण होत आहे. कारण, माणसे नेहमीच आपले निवडींबाबतचे निर्णय बुद्धिनिष्ठतेने घेतात असे नाही. काही लोक व्यवहारात अगदी लहानसाही धोका पत्करतात, किंवा अलीकडे, वाढते आयुष्यमान डोळ्यांसमोर ठेऊनही आणि ऐपत असताही जर कोणी बचत करीत नसतील तर मग 'बुद्धिनिष्ठते'चे काय ? आपला पैसा खर्च करताना जास्तीत जास्त उपयोगितेचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर असतेच असे नाही. शिवाय, हे उद्दिष्ट कसे गाठावे याची नेमकी जाणही असत नाही. शिवाय पूर्वीच्या 'गृहीता'त अडकलेला माणूस अपेक्षेप्रमाणे स्वार्थी असतोच असेही नाही. लोक सामाजिक वा अन्य कामांसाठी देणग्या देताना, स्वतःचा आर्थिक लाभ

पाहतात असेही नाही. मग अशा वास्तव परिस्थितीत, बाजारात विशिष्ट किंमतीला उपभोक्ते अमूक इतकी खरेदी करायला किंवा उत्पादक अमूक इतका उत्पादक पुरवठा करायला तयार असतात असे मागणी-पुरवठ्याचे गणित मांडण्यातही काही अर्थ नाही. बऱ्याचदा परिव्यय आणि लाभ यांची मांडलेली आर्थिक गणितेही, नव्या वर्तनवादी भूमिकेतून पाहता कुचकामी ठरतील की काय, असे वाटू लागले आहे. याचे धोरणविषयक परिणाम महत्त्वाचे होणार आहेत. उदाहरणार्थ, आजच्या उदारीकरणाच्या काळात, समजा एखाद्या वस्तूवरील आयात कर कमी केला, तर एकूण सामाजिक लाभ वाढेल की पर्यायी उद्योगांतील वाढत्या बेकारीच्या परिव्ययामुळे कमी होईल ? यांची उत्तरे काही मोजमापांवर अवलंबून आहेत; आणि असे नेमके मोजमाप तर अशक्यच आहे.

मात्र, नवसनातनवादी सिद्धांताला या नवविचारांनी लगेच काही खिंडार पडेल असेही मानले जात नाही. मिल्टन फ्रीडमनने (हाही अर्थशास्त्राचा एक नोबेल पारितोषिक विजेता आहे !) फार पूर्वीच म्हणून ठेवले आहे की, लोकांनी, 'जसे काही' ते बुद्धिनिष्ठ आहेत असे जवळपास वागले तरी ते पुरेसे आहे. आणि समाजात एक 'सरासरी'ही घडून येत असतेच. उदाहरणार्थ, काही लोक जेव्हा खूपच कमी बचत करीत असतात, तेव्हाच काही लोक अगदी अतिरिक्त बचत करणारेही असतात. त्यामुळे मागणी-पुरवठ्याचे वक्र आजही दिशादर्शक आहेत, असे मानले जात आहे. मानसशास्त्र मात्र अर्थशास्त्राला दिशा द्यायला पुढे सरसावले आहे हे निश्चित !

*(संदर्भ- इकॉनॉमिस्ट १० मे २००३)*

■■

---

*(पान क्रमांक २ वरून)*

जीवन-मरणाचे प्रश्न तसेच म्यानमारमधील हुकुमशाही वृत्तीचे व नव्या युगाची सरंजामशाही हे विषय उपयुक्त वाटले. ही पत्रिका मराठीतून प्रसिद्ध होत असल्याने वाचून समाधान वाटले. या पत्रिकेतून निष्पक्ष माहिती मिळाल्याबद्दल आपले अभिनंदन.

प्रा. नरेंद्र गायकवाड, एरंडोल, जिल्हा-जळगाव

आपण अर्थबोधपत्रिकेतून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सखोल माहिती पोचवीत आहात. पत्रिकेचे वाचन केल्यावर आनंद झाला. ही पत्रिका ज्ञानवर्धक आहे.

सुनील महाजन, दिग्रस (देवनगर), जिल्हा यवतमाळ.

# नदीचे मूळ आणि संतांचे कूळ.....

मदर टेरेसा यांना आता लवकरच संतपद प्राप्त होणार आहे. रोममध्ये व्हॅटिकन चर्चकडून त्याची घोषणा होणार आहे. पण आता एक नवाच वाद उद्भवला आहे. धर्म, वंश, इतिहास हे सारे यात घुसळून काढले जात आहेत.

मदर टेरेसा यांचा जन्म २६ ऑगस्ट (की २७ ऑगस्ट?) १९१० ला बाल्कन्समधील स्कोपजे येथे झाला. हे शहर, त्या काळी विविध धर्मांच्या, वंशांच्या नि देशांच्या नागरिकांनी व्यापलेले होते. टर्कस्, ग्रीकस्, सर्बस्, बल्गेरियन्स, मॅसिडोनियन्स, जिप्सीज्, लाकस् आणि अल्बेनियन्स् असे सर्वच तिथले रहिवासी. मदर टेरेसा सर्वांमधलीच, सर्वांचीच.

आता इथेच काही वाद उफाळला आहे. निमित्त झाले आहे एका पुतळ्याचे. १९९७ साली (५ सप्टेंबरला) मदर टेरेसा यांचे निधन झाल्यानंतर, मॅसिडोनियाचे प्रसिद्ध कलावंत टोम सोराफिमोस्की यांनी, मदर टेरेसांचा, ब्रॉन्झचा एक नऊ फुटी पुतळा तयार केला व तो स्कोपजे शहरात मध्यवर्ती ठिकाणी बसविण्यात आला आहे. आता लवकरच संतपद प्राप्त होणाऱ्या मदर टेरेसांचा आणखी एक तसाच पुतळा बनवून, तो रोमला देणगी म्हणून द्यावा असे सोराफिमोस्की यांनी ठरविले. ज्या दिवशी व्हॅटिकन चर्चकडून संतपदाची घोषणा होणार आहे, त्याच दिवशी तो प्रदान करावा असा त्यांचा प्रयत्न आहे.

परंतु गेल्या महिन्यात स्कोपजे येथील 'फक्ती 'या अल्बेनियन वृत्तपत्राने अशी बातमी प्रसिद्ध केली की, या पुतळ्यावर 'मॅसेडोनियन डॉटर ' असे कोरले जाणार असल्याची माहिती इटलीमधून मिळाली आहे. या बातमीने अल्बेनियन पुढारी संतप्त झाले आहेत. यामुळे 'अल्बेनियन ' नागरिकत्वाचा शिक्का पुसून, मदर टेरेसांचे मूळचे कूळच नाहीसे करण्याचा हा डाव असल्याची भावना एका पुढाऱ्याने व्यक्त केली आहे.

अल्बेनियन्सचा एक मोठा वांशिक गट येथे आहे. मॅसेडोनियन्सही सुमारे वीस लाख आहेत;पण ते स्वतःला ॲलेक्झांडर द ग्रेट सारख्या मॅसिडोनियन्सचे वंशज समजतात; आणि नुकतेच २००१ साली त्यांनी अल्बेनियन लोकांशी संघर्ष

करून आपल्याला राजकीय अधिकार प्राप्त करून घेतले आहेत. वादाचा प्रश्न आणखीनच गुंतागुंतीचा झाला आहे, तो आणखी एका कारणाने. मदर टेरेसा या धर्माने रोमन कॅथॉलिक आहेत तर बहुसंख्य अल्बेनियन्स हे मुस्लिम आहेत; आणि यामुळेही मदर टेरेसांच्या वांशिक मुळाबाबत शंका प्रदर्शित केल्या जात आहेत. जास्मिना मिरोंन्स्की या सुप्रसिद्ध मेसाडोनियन पत्रकार असून त्यांनी दोन ग्रंथ मदर टेरेसांवर लिहिले आहेत. त्या म्हणतात की, मदर टेरेसांची आई ही वंशाने अल्बेनियन होती यात काही शंका नाही, पण त्यांचे वडिल मात्र मिश्र वर्णाचे होते. त्यांच्या नावावरून ते वाल्च म्हणजे वालाचियन या समाजाचे असावेत. शिवाय मदर टेरेसांना अल्बेनियम भाषाही अवगत नव्हती.

आता हा वाद मॅसोडोनियाकडून अल्बानियाकडून बुद्धिमंतांच्यात जाऊन पोचला आहे. अर्थात, स्कोपजेचे महापौर रिस्टो पेनोव्ह यांनी या वादावर भाष्य करताना म्हटले आहे की हा पुतळा देणगी म्हणून देताना त्यावर 'मेसाडोनियन डॉटर ' असे काही लिहिण्याचा प्रस्ताव मुळीच नव्हता. फक्त एवढेच लिहायचे होते की, 'जन्म स्कोपजे येथे २६ ऑगस्ट १९१०,मृत्यू कलकत्ता येथे ५ सप्टेंबर १९९७'

मात्र 'फक्ती' वृत्तपत्राचे म्हणणे अजून असे आहे की याबाबतीत त्यांना मिळालेली माहिती बरोबर आहे.

एका इटालियन ननच्या म्हणण्यानुसार, 'मदर टेरेसांनी वयाच्या १८ व्या वर्षी स्कोपजेला रामराम ठोकला आणि जगाच्या दुसऱ्या टोकाला, कोलकत्त्याला जाऊन आपले सारे आयुष्य व्यतीत केले. त्यांना अल्बेनियन भाषा जरूर येत होती, पण, त्यांना इतर कोणत्याही नागरिकत्वापेक्षाही आपण भारतीय आहोत असे वाटत होते.'
(संदर्भ - इयान फिशर - 'न्यूयॉर्क टाइम्स,' द हिंदू )

■■

'आपले काम आपण केलेले चांगले' या अर्थाच्या विविध भाषेतील म्हणी अशा -
<u>मराठी</u> - आपला हात जगन्नाथ, <u>हिन्दी</u> - अपना हाथ जगन्नाथ, आप काज महाकाज,
<u>गुजराती</u> - आप मुवा विना स्वर्ग न जवाय, <u>पंजाबी</u> - अपणी पत अपणे हाथ,
<u>उर्दू</u> - खुदा का मारा हराम, अपना मारा हलाल, <u>सिंधी</u> - अपनी घोट त नशा थी बेई,
<u>तमिळ</u> - अवरवर अक्करैकु अवरवरे पाडुपडुवार, <u>तेलुगु</u> - अरचेतिलो वैकुंठमु

सामाजिक

# विनोद आणि शिक्षण

विनोद ही गोष्ट माणसांचे ताण क्षणभर दूर करून त्याला प्रसन्न करणारी आहे. लहान मुलांच्या बाबतीत तर ती परस्परांच्यात खेळीमेळीचे वातावरण निर्माण करणारी, मुलांना आनंदी करणारी आणि ठेवणारी बाब आहे. पण, एवढेच नाही. मुलांना आवडणाऱ्या विनोदी प्रहसनांतून जशी करमणूक होते तशीच त्यातून त्यांच्या बुद्धिलाही उत्तेजन मिळते, असे आता संशोधनांतून सिद्ध झाले आहे.

मुलांसमोर आपण विनोदी आणि विनोदी नसलेले असे वाङ्मय वेगळे ठेवले तर मुले त्यांतून विनोदी वाङ्मयाचीच निवड करतात. काय असते विनोदी वाङ्मयात वेगळे असे ? एक तर मुलांना हसायला मिळते; आणि त्यांना तर हसायला आवडतेच. ती त्यांची स्वाभाविक प्रवृत्तीच असते. दुसरे, आता, असे दिसून आले आहे की, त्यात जी विस्मयकारकता असते, अचानक अनपेक्षित असा धक्का बसतो, तो मुलांना अत्यंत सुखावह असतो. त्यामुळे, अमेरिकन टी.व्हीवरच्या 'सीसोम स्ट्रीट' किंवा 'द इलेक्ट्रीक कंपनी' अशा शैक्षणिक कार्यक्रमांतून विनोदाचा आवर्जून वापर करतात. त्याने मुलांच्या शिक्षणाला अधिक सहाय्य होते. संशोधनांतून असे आढळले आहे की, टी.व्ही. कार्यक्रमांमध्ये अधूनमधून विनोदांची पेरणी केली तर मुलांची बौद्धिक जिज्ञासा वाढते आणि त्यांच्या अवधानक्षमतेचा कालावधीही वाढतो.

विनोदांमध्ये अंगभूत असलेली विस्मयकारकता किंवा अनपेक्षितता जी असते त्यामधून मुलांची जिज्ञासा खरी वाढत असते. निसर्गतःच मुले खेळकर वृत्तीची असतात. ती जगाचा शोध घेत असतात, म्हणजेच आपली आपण शिकत असतात.

आपला, म्हणजे प्रौढांचा नेहमीचाच अनुभव आहे की अगदी क्षुल्लक कारणावरून मुले खिदळतात. आपणच त्यांना वेळोवेळी दाटत असतो की 'यात खिदळण्यासारखं काय आहे ?' एखाद्या क्षुल्लकशा गोष्टीवरून हसू का फुटतं, हे मुलांना सांगता येत नाही, त्याचं प्रौढांना हवं असलेलं स्पष्टीकरण देता येत नाही, कारण, असं एखाद्या गोष्टीचं स्पष्टीकरण करणे, ही जरा वरच्या बौद्धिक पातळीवरची गोष्ट असते आणि मुले अजून तिथे पोचायची असतात. स्पष्टीकरण देता येण्यासाठी विश्लेषणाचे कौशल्य, तसेच पुरेशी भाषिक क्षमता आवश्यक असते. म्हणून मोठ्यांनी मुलांच्या खिदळण्याचे

स्पष्टीकरण विचारायचे नसते. तरीही तुम्ही आग्रह धरलाच तर इतकेच होते की मुले एकदम गंभीर होतात आणि छानशा खेळकर वातावरणाला तडा जातो. मुले हिरमुसली होतात.

मुलांच्या दृष्टीने विनोद हाही त्यांच्या खेळाचाच एक प्रकार असतो. प्रौढांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करायचे असतात ते, घरात किंवा शाळेत दबावाचे वातावरण निर्माण न करता, मोकळेपणाचे वातावरण ठेवण्याचे. हास्यविनोदाचे स्थान या संदर्भात महत्त्वाचे आहे. हास्यविनोदाच्या सहाय्याने, मुलांना भाषिक गंमतीजंमतींचे, तार्किक-अतार्किक उड्यांचे, आशयाचा शोध घेण्याचे, शब्दांवर हुकमत प्राप्त होण्याचे असे एक प्रयोगांचे नवे विश्वच उपलब्ध करून देता येते. मग मुलेच आपली आपण विनोदी घटनांचा शोध घेऊ शकतात. खेळता-खेळता मुले, काल्पनिक गोष्टी रचायला लागतात आणि विनोदासाठी निरर्थक शब्दांचीही जोडणी करू लागतात, आजूबाजूला जाणीवपूर्वक पाहून विसंगतीचाही शोध घेऊ लागतात. अशा प्रकारची एक नवी दृष्टी येणे, ही मुलांच्या शिक्षणात अतिशय उपयुक्त ठरणारी बाब आहे.

अमेलिया क्लेन यांनी, 'शिकण्याच्या प्रक्रियेत विनोदाचे स्थान काय आहे, ते नेमकेपणाने सांगितले आहे. (करंट टॉपिक्स इन अर्ली चाईल्डहूड एज्युकेशन, व्हॉल्यूम ७, एल.काझ संपादित. यातील लेख 'चिल्ड्रेन्स ह्युमर : अ कॉग्निटिव्ह डिव्हलपमेंट पर्स्पेक्टिव्ह '). क्लेन यांच्या मते, विनोदाचा शिक्षणाशी अशाप्रकारे संबंध असतो: (१) विनोद हा खेळाचाच एक प्रकार आहे, लहान मुले या नैसर्गिक माध्यमाच्या सहाय्याने, आपले जगाविषयीचे ज्ञान वाढवीत असतात. (२) विनोद हा उच्च आनंद निर्माण करणारा नि प्रगल्भ बुद्धीशी संबंधित भाग आहे. (३) विनोद हा मुलांना प्रश्न सोडवणुकीची संधी देत असतो. कारण, हास्यविनोद, कोडे, विनोदी गोष्ट किंवा कार्टून्स यांमध्ये असणारा विनोद समजावून घेण्यासाठी त्यातील असंबंध्दता हेरावी लागते. (४) विनोदामुळे भिन्नदिशा विचाराला वाव मिळतो; भिन्नदिशा विचार हे सर्जनशीलतेचे एक महत्त्वाचे अंग असते. एखाद्या घटनेतला विनोद समजावून घेताना, वेगवेगळ्या कल्पनांमध्ये नवनवे संबंध शोधावे लागतात. (५) विनोदामुळे मुलांना नियम शिकण्याची संधी मिळते. कारण,विनोदाला एक मूलभूत (नियमबद्ध) रचना असते, विनोदाची एक विशिष्ट तऱ्हेने केलेली बांधणी असते; आणि ती मुले हळूहळू आत्मसात करतात. शाळांच्या वर्गांमध्ये, वर्गातल्या उपक्रमांमध्ये विनोदाचे हे शैक्षणिक कार्य प्रत्यक्षात उतरविणे सहज शक्य असते. मुख्य म्हणजे विनोदी पुस्तके,

विनोदी गाणी-गोष्टी-प्रहसने, कोड्यांची पुस्तके किंवा कार्टून्सच्या मालिका मुलांपुढे आणता येतात. त्यातून मुलांना विनोदाची अंतर्गत रचना माहीत होते. अर्थात, वयाच्या सातव्या-आठव्या वयापर्यंत हे 'बौद्धिक कार्य ' खासच होणार नाही. पण तोवर मुलांना हसायला, खिदळायला वाव देता येईल. गंमतीजेंमती सांगून, त्यांच्या वयाला साजेशा विनोदाला मुलांसमोर आणता येईल; त्यातून मिळणाऱ्या आनंदाबरोबरच त्यांना विनोदात रस निर्माण होईल. पुढे केव्हातरी ते विनोदाच्या 'व्याकरणा'शी आपोआपच सलगी करू लागतील.

दोन ते सहा-सात या वयातील मुलांना, म्हणजे पियाजेच्या वर्गीकरणानुसार 'प्री-ऑपरेशनल स्टेज'मध्ये असणाऱ्या मुलांना बौद्धिक गुंतागुंत असणारे विनोद भावत नाहीत. शारीर पातळीवरील विनोद त्यांना अधिक आकर्षित करतात. चार्ली चॅप्लीन किंवा लॉरेल-हार्डीचे दृष्य विनोद, विशेषत: ज्यात अनपेक्षितता अगदी ढोबळ स्वरूपात असते असे विनोद या वयातील मुलांना भरपूर हसायला देतात, आनंद देतात. म्हणूनच पारंपरिक ऊ टू च्या गोष्टीत अखेरीस येणारा धक्कादायक (ग्राम्य) विनोद, 'पादू कशी ? ढुम्म !' हा पिढ्यान् पिढ्या मुलांचा आवडीचा विनोद आहे.

विनोदातून उद्‌भवणारे हास्य आणि त्यापासून मिळणारा निखळ आनंद लहान मुले काय, मोठी मुले काय किंवा मोठी माणसे काय, सर्वांच्याच बाबतीत समान असतात. परंतु, कोणत्या प्रकारचे विनोद कोणत्या वयाला अधिक साजेसे आहेत, यात वेगळेपण आहे. विशेषत: विनोद ऐकणे वा घडणे, त्याचे बौद्धिक स्तरावरील आकलन आणि हास्यात होणारी परिणती यांच्या मागील बौद्धिक प्रक्रिया मात्र, मुलांच्या बाबतीत, मोठ्यांपेक्षा अगदी गुणात्मकदृष्ट्या वेगळ्या असतात.

बालकांच्या बौद्धिक विकासातील विनोदाचे स्थान ओळखून, त्याचा शिक्षणात सार्वत्रिकरीत्या वापर करण्याची बुद्धी मात्र प्रौढांना व्हायला हवी! ■■

एक गोष्ट माझ्या मनात येते,'जी मुले कुठार'आहे. ती ही की शिक्षण सरकारी तंत्रातून मुक्त असले पाहिजे. शिक्षणावर सरकारचा कसलाच वरदहस्त नसावा. सरकारने शिक्षकाचा पगार अवश्य द्यावा, ते सरकारचे कर्तव्य आहे. परंतु न्यायविभाग-ज्युडिशियरी - जसा स्वतंत्र आहे आणि सुप्रीम कोर्टात सरकारच्या विरूद्धसुद्धा निकाल दिले जाऊ शकतात, आणि दिले गेले आहेत, - जरी त्या न्यायाधीशांचा पगार सरकारातून मिळतो - त्याप्रमाणे शिक्षण विभाग स्वतंत्र असायला हवा. असे जर होणार नसेल तर आपल्या देशाला मोठा धोका आहे. (शिक्षणविचार - विनोबा भावे)

आर्थिक

# 'थिंक स्मॉल' (स्थानसीमित व्यापार)

जागतिकीकरणाच्या काळात, आंतरराष्ट्रीय व्यापाराला पर्याय म्हणून स्थानसीमित (localised) व्यापाराला एक वेगळे महत्त्व मिळत आहे. जागतिकीकरणाचे फायदे-तोटे लक्षात घेऊन अनेक क्षेत्रांत, सरसकट आंतरराष्ट्रीय व्यापाराचे समर्थन न करता, स्थानसीमित व्यापाराला उचलून धरण्याचा विचार व कृती, विविध देशांतील अनेक वेगवेगळे गट करीत आहेत. 'न्यू इकॉनॉमिक फौंडेशन' या संस्थेचे संचालक अँड्र्यू सिम्स हे यांतीलच एक. स्थानसीमित व्यापारावरील व स्थानिकीकरणाशी संबंधित अशा निबंधांचे त्यांचे एक पुस्तक 'रिटर्न टू स्केल,' हे या महिन्यात प्रसिद्ध होत आहे. या प्रकाशनाने एक औचित्य साधण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. इ. एफ. शुमाकर यांनी लिहिलेल्या 'स्मॉल इज ब्युटिफूल ' या पुस्तकाच्या प्रकाशनाला या महिन्यात (सप्टेंबर २००३) तीस वर्षे पूर्ण होत आहेत. जागतिकीकरणाच्या काळात शुमाकर यांचे विचार फार मोलाचे ठरू शकतात, असे सिम्स यांना वाटते.

स्थानसीमित व्यापार महत्त्वाचा कसा, याबाबत सिम्स यांना असे वाटते की, वस्तूंचा उपयोग करताना, वस्तूंची संख्या महत्त्वाची असते. उदाहरणार्थ वेदनानाशक गोळी ही एखाद दुसरीच अशी म्हणजे कमी प्रमाणात घेतली तर फायदेशीर ठरते. पण वेदना थांबविण्यासाठी त्याच गोळ्यांची संपूर्ण बाटली एकदम फस्त केली तर ती घातक ठरू शकते. तसेच काही झाडे कापून तुम्ही जंगलांचे व्यवस्थापन योग्य रीतीने करू शकता, पण जंगलेच नामशेष झाली तर पर्यावरणाचे व जैविक विविधतेचे अस्तित्व धोक्यात येते. याचा अर्थ, एखादी बाब फायदेशीर आहे किंवा कसे हे त्याच्या संख्येवर अवलंबून असते, हे सहज ध्यानात येते. विविध कामांमध्ये एखाद्या वस्तूची संख्या कुठे जास्त हवी व कुठे कमी हे ठरविण्याचे स्वातंत्र्य मात्र संबंधित धोरणकर्त्याला वा व्यवस्थापनाला हवे. हाच नियम व्यापारालाही लागू करता येतो.

पण आज, जागतिक व्यापार संघटना आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या चक्रात अडकलेल्या राष्ट्रांचे याबाबतीत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्यच धोक्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय करारांवर सही केली की जागतिकीकरणाच्या प्रवाहात राष्ट्रांना सामील व्हावेच लागते. त्यामुळे आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला उपयुक्त ठरू शकणारे निर्णय

घेणे फार कठीण होत चालले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत गरीब देशांमधील गरिबी दूर करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे निर्यात वाढविणे असे समजले जाते. तंत्रज्ञानाची कमतरता व अपुरा निधी यांत अडकलेली ही राष्ट्रे निर्यात वाढविण्यासाठी आपली नैसर्गिक उत्पादने उदाहरणार्थ, कॉफी, कोको किंवा कापूस यांचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करीत त्यांचीच थोडीफार निर्यात करतात. पण यामुळे बाजारात या वस्तूंचा ओघ वाढतो आणि मुबलकतेमुळे किंमती कमी होत जातात. मग या राष्ट्रांना निर्यातीमधूनही फारसा आर्थिक फायदा होत नाही, मग पुन्हा निर्यात वाढविण्यासाठी ही राष्ट्रे कर्जाच्या विळख्यात अडकत जातात. १९८० पासून तेल वगळता बहुतेक सर्वच वस्तूंचे आंतरराष्ट्रीय बाजारातील दर कमी झाले आहेत, असे सिम्स म्हणतात.

जागतिकीकरणात भांडवली गुंतवणूक वाढल्याने अनेक आर्थिक प्रश्न निर्माण होतात, असे म्हणून सिम्स यांनी मेक्सिको, कॅनडा, रशिया आणि आशियातील आर्थिक संकटांचा उल्लेख केला आहे. या अशा प्रश्नांचे उत्तर त्यांनी जागतिकीकरणाला व आंतरराष्ट्रीय व्यापाराला स्थानसीमित व्यापाराचा पर्याय देऊन शोधले आहे.

स्थानसीमित व्यापार कसा होऊशकतो हे स्पष्ट करताना सिम्स काही उदाहरणे देतात. जसे की, एखाद्या गावात रेल्वे किंवा बस यांचे उत्पादन करता येणार नाही, पण त्या गावात बेकरीतील सर्व उत्पादने तयार होऊ शकतात. दैनंदिन जीवनातील अनेक ग्राहकोपयोगी उत्पादने स्थानिक पातळीवर तयार झाली तर त्या गावातील रोजगार वाढून अनेकांना त्याचा उपयोग होऊ शकतो. व्यापार करताना, तो व्यापार करणे हे अत्यावश्यक का ठरते ? तर पैसा हवा म्हणून. आणि हा पैसा का हवा तर दुसरे आणखी काही विकत घ्यायचे म्हणून, की जे एरवी न घेताही चालू शकले असते. म्हणजे माणसे आपल्या गरजा वाढवीत जातात म्हणून अनेकदा टाळता येण्यासारखा व्यापारही अत्यावश्यक ठरतो. व्यापार करताना तो उभयपक्षी फायदेशीर ठरणे अपेक्षित असते. पण आंतरराष्ट्रीय व्यापारात बहुतांशवेळा तसे घडत नाही. श्रीमंत देश हे आर्थिक, राजकीय व लष्करी दृष्ट्या गरीब देशांपेक्षा बलवान असतात, त्यामुळे व्यापारातील देव-घेवीत ते या ताकदीचाही उपयोग करून घेऊ शकतात, नव्हे करतातही. मग अशा वेळी आंतरराष्ट्रीय व्यापार हा उभयपक्षी फायदेशीर ठरतोच असे नाही.

अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळालेले अर्थतज्ज्ञ मॉरिस अलायस यांनी एकदा म्हटले होते की, 'जेव्हा दोन देश विकासाच्या समान पातळीवर असतील तेव्हा खुला व्यापार हा फायदेशीर ठरू शकतो,' त्यांच्या म्हणण्याकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष

करण्यात आले. पण आता काही लोक जागे होत आहेत. व्यापारात स्थानिक गरजांना प्राधान्य द्यायला हवे, असे अनेकांना वाटते आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापारात समानता नाही, असे म्हणताना सिम्स सांगतात की बहुराष्ट्रीय कंपन्यांना वेगळे नियम हवे व गरीब देशांसाठी वेगळी नियमावली हवी. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे स्थानिक नागरिकांना व देशांना आपल्या अर्थव्यवस्थेला उपयुक्त असे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य हवे. पण आंतरराष्ट्रीय व्यापारात हे मूलभूत स्वातंत्र्यच संपुष्टात येते. त्यामुळे स्थानसीमित व्यापारातून व स्थानिकीकरणातून जागतिकीकरणाला आव्हान द्यायची वेळ आली आहे. हे आव्हान पेलता आले तरच मुक्त व्यापार हा अत्यावश्यक किंवा जबरदस्तीने केलेला न ठरता तो खऱ्या अर्थाने मुक्त ठरेल.

*(संदर्भ - द इकॉलॉजिस्ट जून २००३)*

■■

## पृथ्वीचा निर्माणकर्ता

"आपल्या या सूर्यमंडळातील पृथ्वीचा निर्माणकर्ता जर एक आहे तर तिजवरील अनेक देशांतील लोकांचे एकमेकांचे वैरभाव माजवून प्रत्येकामध्ये देशाभिमान व धर्माभिमानाचे खूळ व्यर्थ का माजविले आहे ? त्याचप्रमाणे या पृथ्वीवरील अनेक देशांतील सर्व नद्या महासागरात मिळत असतात, त्यापैकी एका देशातील नदी तेवढी पवित्र कशी होऊ शकेल ? या पृथ्वीच्या पृष्ठभागावर एकंदर सर्व मानवी प्राणी अवयवाने व बुद्धिकौशल्याने एकसारखे असून त्यापैकी काही लोक पिढीजात पवित्र बनतात. ते श्रेष्ठ कसे होऊ शकतील ? सर्वांना सारखे जन्म-मरण असून ते सर्वांप्रमाणे सद्गुणाने व दुर्गुणाने निपुण नाहीत का ? कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता, एकंदर सर्व मानवांपैकी जे कोणी आपल्या कुटुंबाचे पोषण करताना जगाच्या कल्याणासाठी सतत कर्म करीत असतात ते आर्य असो, अथवा अमेरिकेतील असो, अथवा ज्याला तुम्ही नीच मानता असा एखादा (चांडाळ) मृतप असो, ते अन्नदान घेण्यास पात्र आहेत. त्यालाच अन्नदान केल्याने निर्मिकाला आनंद होणार आहे."

महात्मा फुले

आर्थिक

# पाणी व्यवस्थापनावरील चर्चासत्र

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने पाणी या विषयावर ३० व ३१ जुलै २००३ असे दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजित केले होते. शासकीय-अशासकीय, अभियंते, समाजकार्यकर्ते आणि शिक्षण व अन्य क्षेत्रांतील तज्ज्ञ या चर्चासत्रास हजर होते. एकूण चार सत्रांमध्ये चर्चेचे आयोजन करण्यात आले होते; व त्यांत (१)शेतीच्या पाणी-पुरवठ्याचे अर्थशास्त्र (२) पाणी वाटपाची पद्धती व तिचे व्यवस्थापन (३) पाणलोट क्षेत्रविकास आणि (४) शहरी पाणीपुरवठा अशा चार विषयांवर बरीच विस्ताराने व सखोल चर्चा करण्यात आली. एम.जी पाध्ये, आर.के. पाटील, एम.एस. हिरेमठ, एस.एन.लेले, एस. एल. भिंगारे, ए. वैद्यनाथन, कल्पना साळुंखे, नीळकंठ रथ, रामदास होनावर आणि विकासचंद्र चित्रे, पी.टी. पंडित व एम.एस. राठोड यांनी प्रामुख्याने दिलेल्या विषयांवर मांडणी केली आणि इतर प्रतिनिधींनी या मांडणींवरील चर्चांतून भाग घेतला.

देशातील पाणीविषयक मुख्य प्रश्न आहे तो अर्थातच पाण्याच्या कमतरतेचा. पाध्ये यांच्या मांडणीत हा विषय नेमकेपणाने उपस्थित केला होता. एक म्हणजे, आजच पाणी अपुरे आहे आणि दुसरे म्हणजे दरडोई पाण्याचे प्रमाण दिवसेंदिवस घटत चालले आहे. त्यामुळे अर्थातच पावसाचे पाणी वाया जाऊ न देता ते जमिनीच्या वर किंवा खाली साठविण्याची गरज आहे. तसेच असलेल्या पाण्याचाही अत्यंत काटकसरीने वापर करण्याची आवश्यकता आहे.

शेतीच्या पाणीपुरवठ्याचा विचार पहिल्या सत्रात करण्यात आला. पाण्याचा जेवढा एकूण वापर होतो त्यातील ८० ते ८५ टक्के पाणी शेतजमिनीला द्यावे लागत आहे. त्या पाण्यापैकी, वाफ होऊन आणि वाहून जाणारे पाणी वजा केले तर जेमतेम ४० ते ४५ टक्केच पाणी शेतातील पिकांना पोचते. तसेच विविध उपयोगांसाठी वापर करावयाच्या पाण्यापैकी जेमतेम ४० ते ५० टक्केच पाणी जमिनीत मुरून साठत असते. त्यामुळे या विषयाचे महत्त्व मोठे आहे. परंतु, पाणी बचतीचा विचार करायचे हेच एकमेव कारण नाही. मुळातच सर्वच जमिनीला पुरेसे ठरेल एवढे पाणी

नाही, हे खरे कारण आहे. मग या अल्प पाण्याचा वापर कसा करावा ? उत्पन्नाचा विचार करताना, भिजलेल्या जमिनीवर एकरी उत्पन्न कमाल करण्यापेक्षा दर एकर इंच पाण्याच्या वापरावर कमाल उत्पन्न कसे पदरी पडेल याचा विचार करायला हवा. मग कमी पाण्यात होणाऱ्या हंगामी पिकांकडून अधिक उत्पन्न मिळू शकेल आणि ऊस किंवा तांदूळाची आजची पाणी वापराची व्यवस्था, तुलनेत कमी उत्पन्नाची ठरेल. या विषयावर सखोल चर्चा झाली; आणि या दिशेने पाणी-उत्पन्न संबंधांच्या विचारावर सर्वमान्यता दिसून आली. पण, मुख्य प्रश्न आला तो, या दिशेने बदल प्रत्यक्षात कसा उतरवता येईल हा. एक पद्धत अशी होऊ शकते की, उपलब्ध शेतजमिनीवर पाण्याचा वार्षिक साठा विभागून दर एकरी पाण्याचा कोटा ठरविता येईल. शेतकऱ्यांना तेवढ्या पाण्याचे वाटप करता येईल मग त्याचे व्यवस्थापन पाणीवापर सोसायट्यांकडे देता येईल आणि प्रत्येक शेतकऱ्यालाही पिकांच्या निवडीचे स्वातंत्र्य राहील. इतरही अनेक प्रश्न यासंदर्भात उपस्थित केले गेले. विशेषतः पाण्याबाबतच्या किंमत धोरणावर चर्चा झाली.

पाणी वाटपाची पद्धती व तिचे व्यवस्थापन, या सत्रामधील चर्चेत प्रामुख्याने नियोजनमंडळाच्या वैद्यनाथन समितीने केलेल्या यासंदर्भातील शिफारसीवर तसेच दर हेक्टरी लागणारे पाणी आणि पाणी वापर करणाऱ्यांच्या संस्थांचे याबाबतींतील अनुभव पुढे मांडण्यात आले. वैद्यनाथन समितीने सुचविले होते की, मुख्य कालव्याच्या खालच्या भागातील पाण्याच्या वापरासंदर्भात जबाबदारी ही पाणी वापर करणाऱ्या संस्थांची, सहकारी संस्थांची किंवा नफाविरहित कंपन्यांची असावी. सर्वच जमीन - मालक आणि शेतकरी यांनी अशा संस्थांचे सभासद असावे व संपूर्ण वाटपव्यवस्थेची जमिनीसहित मालकीच या संस्थांकडे असावी अशी सूचना समोर आली. तिच्यावर उलट-सुलट चर्चा झाली.

पाणी वापराचे नियंत्रण किंमतधोरणाप्रमाणेच कोटा पद्धतीने केले जावे असाही विषय चर्चिला गेला. चर्चेच्या ओघात, महाराष्ट्रातील यासंदर्भातील कार्याचे व संस्थांचे अनुभवही मांडण्यात आले. पाणी पुरवठ्याची खात्री, पाणी वाटपातील न्याय्यता, पीकांनुसार पाण्याचा आणि पाण्याच्या उपलब्धतेनुसार पिकांच्या निवडीचा, याही मुद्यांना स्पर्श करण्यात आला. शासकीय पातळीवर, महाराष्ट्रात, या दिशेने झालेले कायदे व त्यांची अंमलबजावणी यांचेही विवेचन चर्चांमध्ये प्रकर्षाने पुढे आले. तिसरे सत्र होते, पाणलोट क्षेत्र विकासावर. खेड्यांमधील पाणलोट क्षेत्र विकासाचे प्रकल्प बँकांच्या

कर्जांच्या नियमात बसत नसल्याने निर्माण झालेल्या अडचणी आणि त्याबाबतीत काय उपाययोजना होऊ शकतील, हा एक महत्त्वाचा विषय चर्चेत पुढे आला. बँकांना अवघड असल्यामुळे सरकारच्याच खर्चाने या गोष्टी व्हाव्या लागतील यावरही चर्चेत अधिक एकमत दिसून आले. पाणलोट प्रकल्पांमध्ये होणारा पैशांचा वापर हा गैरव्यवस्थापनामुळे मुख्यतः कार्यदक्षतेने होत नाही; तसेच स्थानिक पाणीपुरवठा आणि कालव्यांतून मिळणाऱ्या पाण्याचा पुरवठा यांचा एकत्रच विचार केला जायला हवा, अशा काही विषयांवर चर्चेत प्रकाश पाडण्यात आला. केवळ पाणीच नव्हे तर एकूणच नैसर्गिक साधनसामग्रीचा एकत्रित विचार, विशेषत: जेथे अशा घटकांची कमतरता आहे अशा ठिकाणी व्हायला हवा, यावर भर देण्यात आला.

शहरी पाणीपुरवठ्यावर या चर्चासत्रामधील शेवटचे सत्र होते. कारण, जसजशी शहरांची संख्या वाढते आणि शहरांचा विस्तार होतो तसतसा शहरांतील पाण्याचा प्रश्न भेसूर व्हायला लागतो. अशावेळी, पाणीवाटपाची पद्धती कशी असावी की जेणेकरून पाण्याचा अपव्ययी वापर टाळून, पाणीवापरात काटकसर होईल, याचा प्रामुख्याने या चर्चासत्रात वेध घेण्यात आला. नगरपालिका अलीकडे पाणीवापराच्या प्रमाणावर पाण्याची करआकारणी न करता, एकरकमी कर निश्चित करतात; या धोरणावर या चर्चासत्रात टीका करण्यात आली. तसेच मीटरनुसार पैसे आकारण्याची पद्धतच योग्य असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

■■

## अर्थबोधपत्रिकेसंबंधी निवेदन

अर्थबोधपत्रिकेचा पुढील अंक हा ऑक्टोबर-नोव्हेंबर २००३ असा जोडअंक असेल, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

खास अंक खास विषय

'भारताच्या शेजारी राष्ट्रांमधील सामाजिक परिस्थिती'चा काहीसा वेध घेण्याचा प्रयत्न या खास अंकात केला जाणार आहे.



# शांततेच्या पाऊलखुणा

## (थिच हान्ह व रागावर नियंत्रण)

अमेरिकेवर इस्लामी अतिरेक्यांनी हल्ला केला, या घटनेला या महिन्यात २ वर्षे पूर्ण होत आहेत. ११ सप्टेंबर २००१ च्या घटनेनंतर अमेरिकेच्या समाजमनात एक संतापाची व भीतीची लाट उसळली होती. हे कृत्य करण्याआधी त्या अतिरेक्यांची मनेही संताप व द्वेषाने पेटलेली होती. हा पराकोटीचा राग व द्वेष यांतून हिंसाच जन्माला येते, प्रश्न न सुटता आणखी गुंतागुंतीचे होत जातात आणि त्यावर 'बदला' हे एकमेव उत्तर संबंधितांना योग्य वाटू लागते. अशा मानसिकतेतील समाजाला रागावर नियंत्रण ठेवण्याचे, बदला घेण्याचा मार्ग सोडून शांत डोक्याने इतर पर्यायांचा विचार करण्याला प्रवृत्त करणारे व्हिएटनाममधील बौद्ध विचारवंत थिच हान्ह यांचे एक भाषण २५ सप्टेंबर २००१ रोजी इंटरनेटवरून प्रसृत करण्यात आले. राग विसरून शांततेच्या मार्गाकडे नेणारे हे भाषण आजही तेवढेच महत्त्वाचे आणि समयोचित आहे. त्यांच्या भाषणातील काही मुद्द्यांचा हा सारांशः

थिच हान्ह यांनी व्हिएटनामचे युद्ध भोगले आहे. राग, द्वेष, संताप या भावना व त्यामागील समाजमन त्यांच्या परिचयाचे आहे. त्यामुळे त्याचे चिंतन व विचार हे अनुभवांतून घडलेले आहेत. ते म्हणतात, " व्हिएटनाममधील युद्धात शहरे बेचिराख होऊलागली तेव्हा मी अतिशय अस्वस्थ होऊ लागलो. संतापाने मन भरू लागले पण तेव्हाच मला लक्षात आले की मी आत्ता रागात आहे. कुणाबरोबर बोलण्याची ही वेळ नाही. जर मी कुणाबरोबर बोललो असतो तर, त्यातून नुकसान होण्याचीच शक्यता अधिक होती. तेव्हा मी शांत राहणेच पसंत केले. बौद्ध विचारांमध्ये वैचारिक प्रगल्भता मनात निर्माण होण्यासाठी जाणीवपूर्वक श्वसन करणे, जाणीवपूर्वक चालणे अशा काही कृती करण्याला महत्त्व आहे. जीवनातील बहुतांश गोष्टी या आपल्याला जाणीवपूर्वक,म्हणजे सजग राहून, करता आल्या पाहिजेत. जेव्हा तुम्ही जाणीवपूर्वक श्वास घेता तेव्हा तुम्हाला मिळणारी बौद्धिक चालना ही निश्चितपणे वेगळ्या प्रकारची असते. जाणीवपूर्वक कृती करण्याची सवय लागल्यानंतर, जेव्हा तुम्ही अतिशय चिडलेले असता, मनात संताप खदखदत असतो, तेव्हाही तुम्हाला माहिती असते की तुम्ही का

चिडला आहात. पण त्याचे कारण दूर करण्याची वेळ मात्र ती नसते. त्यावेळी फक्त शांत राहणे हेच अत्यंत महत्त्वाचे ठरते. परंतु प्रत्यक्षात तसे होत नाही ही खरी काळजीची बाब आहे. व्हिएटनाममधील युद्धाच्या वेळी अमेरिकेच्या धोरणाच्या निषेधार्थ अनेकांनी संतापाच्या भरात स्वतःला जाळूनही घेतले. आपल्यावर दुःख ओढवून घेण्याचा व त्याद्वारे आपले विचार जगापर्यंत पोचविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. पण लढाऊ विमानांच्या घरघराटात व बाँबवर्षावांच्या आवाजात त्यांचे प्रयत्न विरून गेले. हे असे सगळे असह्य होऊन मी अमेरिकेत चर्चा करण्यासाठी गेलो (१९६६) पण त्यानंतर मला मायदेशी परत जाऊ देण्यात आले नाही. त्यानंतर कितीतरी वर्षे मी परदेशातच अडकलो होतो. या काळात माझ्या लक्षात आले की माणसाचा खरा शत्रू हा माणूस नसतो; तर तो असतो अज्ञान, भीती, हिंसाचार. तेव्हाही व आजही मी अमेरिकन नागरिकांचा द्वेष वा तिरस्कार करीत नाही. माझा त्यांच्यावर राग नाही. फक्त त्या काळातील अमेरिकेच्या धोरणांच्या विरोधात आम्ही बोलत होतो.

"याच काळात अमेरिकेच्या परराष्ट्रखात्यातील एका अमेरिकन अधिकाऱ्याला मी भेटलो. तेव्हा त्याने अतिशय शांत चित्ताने माझे बोलणे ऐकून घेतले. मग कालांतराने अमेरिका-व्हिएटनाम युद्ध आणखी तीव्र झाले, तेव्हा मला कळले की त्या माणसाने युद्धखोरीच्या धोरणांच्या निषेधार्थ आपल्या या नोकरीचा राजीनामा दिला होता.

"आपल्या रागातून बाहेर पडून तुम्ही त्या घटनांचा विचार करू लागलात की मग तुमचे विचार आणखी तावून-सुलाखून बाहेर पडतात. मग समोरच्या मित्राशी किंवा शत्रूशी बोलणे तुम्हाला सोपे जाते. तसेच तुमचे विचारही समोरच्या व्यक्तीला लवकर पटण्याची शक्यता असते. माझ्या मनात राग वा द्वेष नाही म्हणूनही माझे म्हणणे अनेकांपर्यंत पोचते असे मला वाटते. व्हिएटनाममधील युद्धाच्या वेळी मी व्हिएटनाममधील अनेक युवकांशी बोललो. राग व द्वेष सोडून शांतता प्रस्थापित करणाऱ्या संस्था व संघटना स्थापन करण्याचा सल्ला मी त्यांना दिला. आजही अमेरिकेतील युवा नागरिकांना माझे हेच सांगणे आहे. दुसऱ्याचा विचार करून, त्याच्या जागी आपण स्वतः आहोत असे समजून, जर प्रत्येकाने विचार करायचा प्रयत्न केला तर अनेक प्रश्नांची उत्तरे सहजच सापडू शकतात.

"बौद्ध विचारधारेमध्ये प्रत्येक माणसात प्रत्येक भावनेचे बीज आहे, असे मानलेले आहे. जसे रागाचे, दुःखाचे, द्वेषाचे बीज माणसात असते, तसेच समजुतीचे, शहाणपणाचे, क्षमा करण्याचे बीजही माणसात असते. कोणत्या बीजाला पाणी घालून

अंकुरित करायचे हे मात्र माणसाच्या विवेकशक्तीवर अवलंबून असते. अमेरिकेतील नागरिकांजवळ तर फार मोठी हुषारी आहे, विवेकशक्ती आहे. याचा त्यांनी योग्य वापर मात्र करायला हवा. यावेळी ते योग्य कृती करतील अशी माझी अपेक्षा आहे. बौद्ध विचारधारेत, दुसऱ्याचे मत शांतपणे ऐकणे आणि समजून घेणे यालाही अतिशय महत्त्व आहे. जेव्हा तुम्ही शत्रूशीही संवाद साधून त्याची मते समजून घेण्याची तयारी दर्शविता तेव्हा त्या व्यक्तीचाही तुमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलण्याची शक्यता निर्माण होते. शांततेच्या मार्गाला जाण्याचे हे पहिले वळण आहे. दैनंदिन जीवनातही या 'ऐकण्या'चा फार उपयोग होतो. ज्याचें विचार तुम्हाला ऐकून घ्यायचे आहेत ती व्यक्ती तुमचा मित्र वा मैत्रिण, पती वा पत्नी, मुले-मुली किंवा आणखीही कोणी असू शकेल. पण या ऐकण्यातून तुम्ही संघर्षाच्या मार्गापासून थोडेतरी दूर जाता हे नक्की. आपल्यात आज ऐकून घेण्याची तयारी नाही. कारण, आपली मने ही संतापाने व हिंसाचाराने भारलेली आहेत. यातून बाहेर पडणे हे ऐकण्याच्या पायरीसाठी गरजेचे आहे.

"मी ज्या 'प्लम' खेड्यात राहतो तिथे आम्ही शांततेच्या मार्गाकडे जाण्याचे उपक्रम राबवीत असतो. तुम्ही जेव्हा चिडता वा रागावता तेव्हा तुमचा राग फार काळ मनात न ठेवता संबंधिताला सांगणे, न सांगता आल्यास कागदावर लिहून देणे आणि तेही न जमल्यास यात कुणाची तरी मदत घेणे असे उपाय आम्ही सांगतो. एकदा पॅलेस्तिनी व इस्रायली नागरिक आमच्या उपक्रमात सहभागी झाले होते. आमच्या सर्व पद्धती समजावून घेऊन त्याप्रमाणे कृती करणे त्यांना एवढे आवडले की तो गट जाताना म्हणाला, "शांतता ही शक्यतेच्या कोटीतील व व्यवहार्य असू शकते यावर आमचा आत्तापर्यंत विश्वास नव्हता. आता आम्हाला पॅलेस्टाईनमध्ये कधीतरी शांतता नांदू शकेल अशी आशा वाटू लागली आहे. आम्ही आमच्या देशात गेल्यावरही ही पद्धत आमच्यासाठी राबवूच, पण इतरांनाही त्यात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करू ." अमेरिकेसारख्या देशाने अशा शांततेच्या मार्गाकडे जाणारे उपक्रम आयोजित केले तर अमेरिकेसाठी व जगासाठी खूप उपयुक्त ठरू शकेल.

"आपल्याला जगण्यासाठी अनेक कामे करावी लागतात. त्यात जाणीवपूर्वक म्हणजे सजगतेने करण्याच्या काही गोष्टी बुद्धविचारांत सांगितल्या आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचे आहे ते उपभोग घेणे. आणि या उपभोगात पहिला क्रमांक आहे तो खाण्याचा. माणसांना जगण्यासाठी आणि चांगले आरोग्य राखण्यासाठी विविध प्रकारचे अन्नपदार्थ खावे लागतात. ते खाणे गैर नाही. पण लाखो लोक उपाशी मरत असताना

आपण अतिशय खर्चिक आणि अतिरेकी खाणे हे निश्चितच अयोग्य ठरते. मांसाहार करणाऱ्यांनी आपण खाण्यासाठी ज्या प्राण्यांची जोपासना करतो त्याचा विचार करावा. या प्राण्यांना वाढविण्यासाठी जी नैसर्गिक साधनसंपत्ती खर्च होते, तेवढ्यात कितीतरी शाकाहारी व्यक्तींचे पोट भरू शकते. पाणी वा इतर नैसर्गिक सामग्री वापरतानाही असा विचार व्हायला हवा. आज अमेरिकेच्या चंगळवादी व टोकाच्या व्यक्तीस्वातंत्र्यवादी संस्कृतीमुळे कदाचित अमेरिका ही रागाचा केंद्रबिंदू झाली असेल तर अमेरिकेने आपली भूमिका पुन्हा तपासून पाहिली पाहिजे.

अशाच प्रकारे, बुद्धविचारात मानसिक उपभोगाचाही विचार आहे. आपण जे काही ऐकतो, वाचतो, पाहतो त्यातून आपले मन म्हणजे विचार घडत जातात. त्यामुळे कलेचाही आस्वाद घेताना त्यातून आपण हिंसेला, रागाला व बदला घेण्याच्या वृत्तीला थारा तर देत नाही ना, हा विचार व्हायला हवा.

प्रत्येक व्यक्तीची स्वतंत्र बुद्धी, विचारशक्ती आणि तीव्र इच्छा-आकांक्षा यांचा विचार केला तर असे लक्षात येते की प्रत्येकाला आपल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्याचा ध्यास असतो. हीच इच्छा-आकांक्षा व्यापक समाजहिताची असेल तर त्यातून चांगले काही जन्माला येऊ शकते. अन्यथा या आकांक्षेपोटी आपण कळत-नकळत हिंसेलाही जन्म देत असतो. त्यामुळे मूळ आकांक्षा हीच मुळी जगात सौहार्द, प्रेम निर्माण करण्याची, बदला न घेण्याची, कुणाला शिक्षा न करण्याची व कुणाला मारण्याची नसावी, असे अपेक्षित आहे.

कुणाहीबद्दल राग व बदला यातून हिंसा निर्माण होते म्हणून रागापासून आपला बचाव करणे हे प्रत्येकाने जाणीवपूर्वक केले पाहिजे. मला राग येतो तेव्हा मी दोन्ही हातांनी माझा चेहरा झाकून घेतो.......तेव्हा मी रडत नसतो,

..... तेव्हा मी कुणालाही दूषणे देत नसतो तर,

.....तेव्हा मी माझ्या दोन्ही हातांनी माझे रक्षण करीत असतो,

..... तेव्हा मी माझ्या हातांनी जोपासना करीत असतो, कुणाची ? तर,

.......माझ्याच मनाची.

...मी रागापासून आणि हिंसेपासून मनाला जपत असतो,

...आणि सद्भावना व सामंजस्य यांची जोपासना करीत असतो. ”

*(संदर्भ - इंटरनेट)* ■■

## जगाच्या पाठीवर.....

### भ्रष्टाचार आणि जादूची कांडी

विविध देशांमधील सध्याच्या लहान मुलांच्या (शहरांतील) विश्वाला हॅरी पॉटर नावाचा त्यांच्याच वयाचा जादुगार आणि त्याची जादूई कामगिरी यांनी भुरळ पाडली आहे. लहान मुलांप्रमाणेच मोठी माणसेही या कांडीची स्वप्ने पाहत आहेत की काय, असे 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' या संस्थेच्या एका अहवालावरून वाटते. या संस्थेने अलीकडेच देशादेशांतील भ्रष्टाचाराविषयी अभ्यास केला आणि यासंबंधी किमान ४८ देशांमधील नागरिकांची मते जाणून घेतली. संस्थेने 'गॅलप इंटरनॅशनल'च्या सहकार्याने एक सर्वेक्षण केले. त्यात नागरिकांना विचारलेल्या काही प्रश्नांमध्ये एक महत्त्वाचा प्रश्न असा होता - सर्वात जास्त भ्रष्टाचार कोणत्या क्षेत्रांत आहे, असे त्यांना वाटते ? आणि या नागरिकांना जर जादूची कांडी दिली तर कोणत्या क्षेत्रातील भ्रष्टाचार दूर करण्याला ते अग्रक्रम देतील ? या प्रश्नाचे उत्तर बहुतेक देशांमधील बहुतांश नागरिकांनी 'राजकारण' हे दिले आहे.

भ्रष्टाचारात, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे न्यायखाते व पोलीसखाते आहे. त्यानंतर आरोग्यखात्याचा आणि शिक्षणक्षेत्राचा उल्लेख नागरिकांनी केला आहे. अर्जेन्टिना आणि जपान या देशांमधील राजकीय क्षेत्रात सर्वात जास्त भ्रष्टाचार असून तेथील नागरिकांनी हाच भ्रष्टाचार दूर करण्यास प्राधान्य दिले आहे.

अनेक देशांमधील राजकीय नेत्यांना, नागरिकांनी हा एक संदेश (अथवा समज) दिला आहे. याची त्यांनी योग्य दखल घेणे अपेक्षित आहे, असे मत 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल'चे अध्यक्ष पीटर आयजेन यांनी व्यक्त केले आहे.

भ्रष्टाचाराच्या 'भविष्या'ची दखल घेताना कोलंबिया आणि इंडोनेशिया या देशांमधील नागरिक, आपल्या देशातील भ्रष्टाचार कमी होईल अशी आशा करीत आहेत. मात्र, भारतातील बहुसंख्य नागरिकांनी तसेच टर्कस् व दक्षिण आफ्रिकेतील नागरिकांनी आपल्या देशात भ्रष्टाचार वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे. 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' या संस्थेचा हा अहवाल www.transparency.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

*(संदर्भ - डाऊन टू अर्थ १५ ऑगस्ट २००३)* ■■

# प्राणी खाऊन आजार पळवा ! (की ओढवून घ्या ? )

'अपायकारक भरपेट अन्न' या शीर्षकाने, हन्ना बीच यांनी टाईमच्या (९ जून २००३) अंकात एक छोटासा लेख लिहिला आहे. लेखाच्या मध्यभागी दिलेली चौकट एकदम लक्ष वेधून घेते. ती आहे शांघाय-चीनमधील हॉटेलांमधील काही वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची त्यांच्या किंमतीसहित आणि गुणांसहित यादी. ही यादी अशी :


| प्राणी | किंमत (रुपयांत बदलून) | तपशील |
|---|---|---|
| खवले मांजर | १५००/-(प्लेटसाठी)<br>६०००/-(सबंध प्राणी) | थंडीच्या दिवसात खातात; विशेषतः फ्ल्यू घालविण्यासाठी |
| रानमांजर | १२०० /-(प्लेटसाठी)<br>५२२०/-(सबंध प्राणी) | अतिशय तिखट, चेहऱ्यावरील मुरूम नाहीसे करण्यासाठी |
| उंट | ३०००/-(प्लेटसाठी) | विशेषतः उंटाच्या पाठीची मदार, ब्राऊन सॉसमध्ये शिजवलेली, हा लोकांचा अत्यंत आवडीचा प्रकार. |
| सर्प | १८००/-(प्लेटसाठी) | उन्हाळ्यात रक्त थंड करतो, आपली कातडी (त्वचा) नितळ करतो |
| कुत्रा | १५०/-(प्लेटसाठी) | वेगवेगळ्या पाच मसाल्यांच्या सहाय्याने शिजवून केलेला रस्सा स्वादिष्ट लागतो. |

हे सर्व पदार्थ अतिशय रुचकर म्हणून लोक त्यांचा मनापासून आस्वाद घेतात. पण म्हणूनच केवळ लोक या हॉटेलांमध्ये पाय ठेवतात असे नाही. नागाचे विविध पदार्थ करण्यात पटाईत असलेला जॉर्ज नंग म्हणतो की, उद्योगपती इथे येतात ते आपल्या पैशांचे प्रदर्शन करण्यासाठी. इथे 'बिझिनेस पार्ट्या ' होतात आणि मोठाली कंत्राटे दिली-घेतली जातात; ती इथल्या भारी चवींच्या प्रभावामुळेही. मात्र आता, खवय्यांच्या या सगळ्या चैनीवर सरकारी कुऱ्हाड आली आहे. 'सार्स ' रोगाचा प्रादुर्भाव झाल्यापासून सरकारने जंगली प्राण्यांच्या कत्तलीवर आणि त्यापासून तयार केलेल्या अन्नावर बंदी घातली आहे; कारण या रोगाचा प्रादुर्भाव प्राण्यांपासून होत असावा असा कयास आहे. तरीही चीनमधील नवश्रीमंतांची चंगळवादी वृत्ती लक्षात घेता ही हॉटेले आणि त्यामधील जंगलीपदार्थ नाहीसे होतीलच असे नाही. ■■

# कालप्रवाहात..

## लष्करावरील खर्च आणि शांततेचे नोबेल

अमेरिकेची युद्धखोरी जगजाहीर आहे. अमेरिकेचा युद्धाशी संबंधित विविध बाबींवर होणारा खर्च अब्जावधी रुपये (किमान ४०० बिलियन अमेरिकन डॉलर्स) असून या खर्चात अर्थातच, सर्व देशांमध्ये अमेरिकेचा पहिला क्रमांक आहे. पण आश्चर्य म्हणजे शांततेची नोबेल पारितोषिके मिळविण्यातही अमेरिका आघाडीवर आहे. शीतयुद्धाच्या काळात अमेरिकेचे शत्रुराष्ट्र असलेल्या रशियाला मात्र फक्त दोनवेळा शांततेचे नोबेल पुरस्कार मिळाले आहेत. अमेरिकेच्या पाठोपाठ ब्रिटन व फ्रान्सने शांततेची नोबेल पारितोषिके मिळवली आहेत. खालील आलेखावरून हे स्पष्ट होईल. (आलेखात डाव्या बाजूला कंसात दिलेले आकडे पुरस्कारांची संख्या दर्शवितात)




*(संदर्भ - पॉकेट वर्ल्ड इन फिगर्स, द इकॉनॉमिस्ट १९९९, इकॉनॉमिक टाइम्स)* ■■

> 'या देशात सनातनीपणाला फारच मोकळे रान मिळाले आहे. फारच मोकळे.'
>
> डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# अर्थबोधपत्रिका चौकस गट

अर्थबोधपत्रिकेच्या वाचकांमध्ये तरूण विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे; आणि ती तशी वाढावी असा या मासिकाचा प्रयत्नही आहे. नव्याने पसरू पाहत असलेल्या ज्ञानयुगात, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या औपचारिक शिक्षणाच्या कक्षांबाहेर पडून व्यापक ज्ञानमय जगाची अधिक ओळख करून घेतली पाहिजे, अशी गरज तीव्रतेने निर्माण झाली आहे.

बौद्धिकतेच्या क्षेत्रात उतरण्याचे अर्थबोधपत्रिका हे एक साधन आहे.

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर यांचा प्रयत्न असा आहे की, पदव्युत्तर किंवा पदवी पातळीवरील महाविद्यालयीन विद्यार्थी, त्यांची व्यापक ज्ञानक्षेत्रातील प्रवेशाची गरज आणि अर्थबोधपत्रिका हे मासिक या तिन्हींची सांगड घालावी. ज्ञानार्थी विद्यार्थ्यांचा एक चौकस गट त्यातून निर्माण व्हावा.

प्रा. दाभोळकर यांच्या सहकार्याने एक योजनाच आखली गेली आहे.

## चौकस गट

• जे पदवी-पदव्युत्तर विद्यार्थी १ जानेवारी २००४ पर्यंत अर्थबोधपत्रिकेचे सभासद होतील त्यांना, १०० रुपये वर्गणीत, एक वर्षाऐवजी दोन वर्षांचे सभासदत्व मिळेल. •या विद्यार्थ्यांना भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या ग्रंथालयाचा लाभ, विनाशुल्क घेता येईल. • अर्थबोधपत्रिकेच्या या विद्यार्थी-सभासदांचा एक चौकस गट स्थापन केला जाईल. • या चौकस गटाच्या बौद्धिक स्वरूपाच्या मासिक सभा या संस्थेच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित केल्या जातील. याच्या पहिल्या सभेस स्वत: प्रा. दाभोळकर विद्यार्थ्यांबरोबर चर्चेसाठी हजर असतील. • चौकस गटाचे नेतृत्व आणि कार्यक्रमांचे सर्व संयोजन गटाच्या सदस्यांकडे पहिल्या सभेत सुपूर्त केले जाईल.

<u>**संपर्कासाठी**</u> : (१) भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, अर्थबोध, ९६८- २१/२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६,

(२) डॉ. के. एन्. बवले, प्राचार्य, आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे- ४१० ५०४

# धर्माभिमानाचे परिणाम

फुले यांनी सत्यशोधक समाज स्थापन करून ब्राह्मण धर्माविरुद्ध मोहीम सुरू केली. ब्राह्मणांनी स्थापित केलेल्या हिंदू धर्मापेक्षा श्रेष्ठ किंबहुना जगातील प्रचलित कोणत्याही धर्मापेक्षा उच्चतर व श्रेयस्कर तत्त्वांच्या आधारावरच ब्राह्मणप्रणीत हिंदू धर्माविरुद्ध चळवळ करणे हे सफल होऊ शकेल अशी कल्पना त्यांना पूर्णपणे होती. त्यांनी जाहीर केले की, जगातील प्रत्येक प्रस्थापित व प्रचलित धर्म हा मनुष्यावर होणाऱ्या काही अन्यायावर तरी आच्छादन घालतो व सत्याचा काही अंश तरी लपवू इच्छितो. सर्व मनुष्यजातीचे बंधुत्व व शुद्ध सहकार्य यांच्या आड आजच्या जगातील धर्मभेद येत आहेत व विशिष्ट धर्माच्या अभिमानाने मनुष्यजातीचे तुकडे पडले असून वैराचे बीज कायमचे रोवले गेले आहे. धर्माभिमानाने मनुष्यजातीचे रक्त अनेक वेळा वाहिले आहे. सर्व मानवांचे ऐक्य हे एक श्रेष्ठ सत्य आहे आणि सत्याचा अपलाप व नाश धर्माभिमान करतो. धर्माभिमानाने मनुष्यजातीची प्रगती करावयाच्या ऐवजी तिचा महान अधपात केला आहे. म्हणून प्रचलित सगळे ऐतिहासिक धर्म मनुष्यजातीत सत्याची संपूर्ण स्थापना करू शकत नाहीत.

जी धर्माभिमानाची गोष्ट तीच राष्ट्रवादाची किंवा देशाभिमानाची गोष्ट होय. देशाभिमान हा अत्यंत अपवित्र आहे. देशाभिमानाने किंवा राष्ट्रवादाने एक मानवसंघ दुसऱ्या मानवसंघावर आक्रमणास नेहमी सज्ज राहातो. त्याच्यामुळे युद्धे होतात आणि मनुष्याचे कर्तृत्व वाया जाते. लढाईकरिता राष्ट्रांना सज्ज राहावे लागते व त्यामुळे प्रचंड लष्करी खर्च करावा लागतो. त्यामुळे देशातील लोकांवर विशेषत: शेतकऱ्यांवर कराचा फाजील बोजा पडतो. मनुष्यजातीतील युद्धे आणि आक्रमणे बंद पडली पाहिजेत व त्याकरिता धर्माभिमान, राष्ट्राभिमान या विकृत व हीन मनोगंडरूपी भावना नष्ट केल्या पाहिजेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

(संदर्भ - लेखसंग्रह - खंड पहिला पृष्ठ ४००)

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●अजित कर्णिक ●विकासचंद्र चित्रे ●मृणाल दत्तचौधरी ●कुमुदिनी दांडेकर
●ललित देशपांडे ●द.ना. धनागरे ●आनंद नाडकर्णी ●रमेश पानसे
●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●के. एन्. राज ●व्ही.एम्.राव ●ए.वैद्यनाथन
●सत्यरंजन साठे ●रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**